प्रथम शिंद्यांकडील तोफखाना सुरू होऊन होळकरांचे आघाडीवर गोळ्यांचा वर्षाव चालला. त्यावरून होळकरांडील फ्रेंच सरदारानें आपल्या थोडयाशा तोफांचा मारा त्या तोंडावर चालविला. नंतर कांहीं वेळानें विंचूरकर, रास्ते, व गोखले यांनीं डावे बाजूनें पुढें चाल केली. तेव्हां होळकरांचा एक सरदार त्यांजवर पुष्कळ स्वारांनिशीं चालून आला. त्या प्रसंगी तुमुल युद्ध होऊन होळकरांचे स्वारांस नरसिंहराव विंचूरकर, रास्ते व बापू गोखले यांच्या फौजांनीं मागें हटवून लाविलें. ते वर्तमान यशवंतराव यांस कळलें तेव्हां त्यानीं आपले मुख्य सरदारांस बोलावून भाषण केलें कीं, " आजचा प्रसंग आणीबाणीचा आहे. मी आज असा निश्चय केला आहे कीं, एक तर जय मिळवीन, नाहींपेक्षां मरून जाईन. यांत सामील होण्याची तुम्हांपैकीं कोणाची खुषी असेल तर मजबरोबर रुधिरगंगेंत स्नान करण्यास चलावें. ज्यांची खुषी नसेल त्यांनीं स्पष्ट सांगून आतांच अलग व्हावें, परंतु तोंडावर गोड बोलून शेवटीं मला कोणीही दगा देऊं नये, एवढेंच माझें सर्वांस सांगणें आहे." त्याजवर सर्व सरदारांनीं शपथपूर्वक सांगितलें कीं, "आम्ही पूर्वींच आपले सुखदुःखाचे भागीदार झालों आहों, तेव्हां आतां आम्हांकडून कोणतेही प्रकारें कसूर होणार नाहीं. आपल्याबरोबर आम्ही आपले जीव खर्ची घालण्यास अगदीं तयार आहों. " याप्रमाणें भाषण झाल्यावर सर्वांस पुढें होण्याची सूचना करण्यासाठीं यशवंतराव यानीं भंडार उधळून 'जय खंडेराव' असा मोठ्यानें शब्द केला, आणि नग्न तरवार हातांत घेऊन आपला घोडा झपाटयानें पुढें चालविला. त्याजबरोबर एकदम चाळीस पन्नास हजार स्वारांनीं चाल केली. तें पाहून शिंद्यांचे सरदारांनीं त्यांजवर झपाटयानें गोळ्यांचा वर्षाव केला; परंतु यशवंतराव यांनीं मागें पुढें न पाहतां एकदम तोफखान्यावर हल्ला केला. ते तोफखान्याजवळ जाऊन पोहोंचत तोंपर्यंत त्यांचे आठदाहा हजार स्वार शिंद्यांकडील तोफांचे भडिमारानें पडलें.

तत्रापि बाकीच्या स्वारांचा हल्ला पोहोंचतांच तोफा बंद होऊन संगिनी व भाले यांचा सामना झाला; आणि रणतुंबळ होऊन शेवटीं होळकरांनीं सर्व तोफा हिसकावून घेतल्या, आणि पलटणीं-तील पायदळ व स्वार यांची मोठी कत्तल उडवून त्यांस पळवून लाविलें. इतक्यांत त्यांचे उजवे बाजूनें विंचुरकर वगैरे सरदा-रांनीं त्यांजवर हल्ला केला. त्यांत नरसिंगराव हे आघाडीस हो-ते. त्यांनीं जो निकरानें हल्ला केला त्यांत पहिलेंच तडाक्याबरोबर त्यांचे दोन हजार शिलेदार मानकरी पडले. तथापि लढाई न सोडितां त्या बाजूकडील लोकांनीं पुढें चाल केली. तेव्हां कोट-मगांवकर बाबूराव नाना यांचे चिरंजीवांस असाध्य जखमा ला-गून त्यांचे हाताखालचे पंधराशें स्वार पडले, व खुद्द नरसिंहराव यांचे छातीवर हीं तरवारेची जखम लागली. या वेळेस ते यशवंतराव होळकर यांचे समीप पोहोंचले होते. पूर्वी पुणें येथें यशवंतराव व नरसिंहराव यांचा परस्पर स्नेह असून ते मैदानांत बोथाटी खेळण्यास बरोबर जात असत. यामुळें यश-वंतराव यांची व त्यांची चांगलीच ओळख होती. यशवंतराव हे या ठिकाणीं नरसिंहरावांस पक्कें ओळखून मोठ्यानीं बोलले कीं, "नरसिं-राव! तुम्ही माझे मित्र आहां, शत्रु नाहीं; माझा जो शत्रु शिंदा त्याचे फौजेवर माझा हल्ला आहे, तुम्हीं आपलें कर्तव्यकर्म उत्तम प्रकारें केलें. आतां परत जावें" होळकरांकडील लोक नरसिंहराव यांजवर धांवून जाणार होते; परंतु होळकारानीं त्या सर्वांस तसें करण्याची मनाई करून नरसिंहराव यांस परत लावून दिलें.

नंतर यशवंतराव होळकारांनीं पेशव्याचे फौजेसुद्धां जमलेल्या इतर सर्व सरदारांच्या फौजांचा अगदीं मोड करून सर्वांस पळवून लाविलें, आणि पुण्याचे पुर्वेस जवळच छावणी केली. त्यांचे अनिवार शिपायांनीं पुणें शहर लुटण्याचा इरादा दर्शविला; परंतु त्यांनीं तसें करण्याची त्यांस अगदीं मनाई केली, आणि त्या श-हरास बिलकूल उपद्रव नकरितां त्याचा चांगला बंदोबस्त ठेविला.

ही लढाई संपल्यावर दुसरे दिवसी इंग्रज सरकारचे पुणें येथील रेसिडेंट हे होळकर यांचे भेटीस गेले. होळकर हे आपले सरदारांसह चिखलाचे जमीनीवर टाकलेल्या जाडया चटयांवर बोलत बसलेले, त्यांचे डोक्यास तरवारेची एक व संगीनीची एक अशा दोन लाहानशा जखमा लागलेल्या असे त्यांचे दृष्टीस पडले. त्या जखमा बऱ्या होण्यास्तव त्यांस कांहींच उपचार केलेला नव्हता. तेणेकरून रेसिडेंट साहेबांस अचंबा वाटून त्यांनीं होळकर यांस विचारिलें कीं, "तुम्ही आपल्या जखमा बऱ्या होण्यास्तव त्यांस औषधोपचार कां करीत नाहीं ?" होळकरांनीं जबाब दिला कीं, "हे केवळ ओरखडेच आहेत. असे पुष्कळ वेळा निघतात. हे आपोआप बरें होतील. यांस औषधोपचार करण्याची जरूर नाहीं." या बेपर्वाइचे जबाबाने रेसिडेंट साहेब चकित होऊन उगेच राहिले. *

नरसिंहराव रणभूमीतून निघून आपले तळावर आले तों श्रीमंतांकडून दोन सांडणी स्वार धांवत येऊन त्यांनीं त्यांस असें कळविलें कीं, "श्रीमंतांची स्वारी गुलटेंकडीवर उभी असून तेथें त्यांनीं आपल्यांस अति सत्वर बोलाविलें आहे." त्यावरहुकूम नरसिंहराव तीनशें स्वारांनिशी लागलेच गुलटेंकडीवर गेले. तों श्रीमंतांची स्वारी पूर्वीच पुढें चालती झाली होती असें त्यांस कळून आलें. तेव्हां त्यांनीं भरधांव घोडे टाकीत श्रीमंतांचे स्वारीस गांठिलें. ते श्रीमंतांजवळ पोहोंचले तेव्हां त्यांजबरोबर कितीएक स्वारांचे जखमांतून रक्तस्राव चालला आहे; सर्वांचे हातांत नग्या तरवारी आहेत; खुद्द नरसिंहराव यांचे छातीवर जखम लागलेली असून तींतून रक्त गळत आहे, व त्यांची मुद्रा केवळ पिसाळलेल्या वाघासारखी झालेली आहे, असें श्रीमंतांनीं पाहून त्यांस मोठें आश्चर्य वाटलें; आणि नरसिंहराव यांचे शूरत्व व स्वामिभक्ति यांविषयीं त्यांची पूर्ण खातरी झाली.

---

* ग्रांटडफसाहेब कृत मराठ्याचा इतिहास.

नरसिंहराव यानीं हात जोडून श्रीमंतांस विनंति केली कीं, महाराज ! " सांप्रतचे हल्यांत माझे शूर व लढाया मारून घटलेले असे तीन हजार मित्र रणांगणी पडले ! शिवाय ज्याचे सोबतीनें मी लाहानपणासून विद्याभ्यास केला असून ज्यास मी आपले पुत्रासमान मानिलें होतें, व ज्याचें शूरत्व अत्यंत वर्णनीय होतें असा जो माझ्या सेनापतीचा पुत्र त्यास असाध्य जखमा लागून तोही रणांत पडला; परंतु ह्या सर्व गोष्टींची मी आतां पर्वा न बाळगितां एवढीच विनंती करितो कीं, सरकारांनीं थोडा धीर धरावा. मी आणखी एकवार सैन्याची उठावणी करितों. त्यांत माझी तरवार यशवंतराव यांचे रक्तपान करील किंवा माझें शीर जाईल; परंतु हल्ला करण्यास आज्ञा मात्र मिळावी. " पेशव्यांनीं ती विनंती न ऐकतां आम्हांनें नरसिंराव यांस आपल्याबरोबर येण्याविषयीं आज्ञा केली. या वेळेपूर्वी नरसिंहराव यांचे रक्तबंबाळ झालेल्या शरीराविषयीं श्रीमंतांनीं कांहींच उद्गार काढिला नव्हता, परंतु आतां ते त्यांस म्हणाले कीं, " नरसिंहराव ! तुमचे छातीस जखम लागली आहे याचा विचार तुह्मी काय केला आहे ? तेव्हां मात्र आपल्यास जखम लागल्याचें नरसिंहरव यांस भान आलें. असो; त्यांस श्रीमंमतांबरोबर जाणें भाग पडलें. मग त्यांनीं एका सांडणीस्वाराबरोबर बाबूराव नाना, जे शेष राहिलेल्या फौजेसुद्धां तळावर होते, त्यांस सांगून पाठविलें कीं, " तुह्मी सर्व फोजेनिशी स्वारींत येऊन मिळावें. " नंतर त्यांनीं दुसरे सांडणीस्वाराबरोबर कारभारी बाळोबाबाबा यांस असा निरोप पाठविला कीं, " मी पेशव्यांचे स्वारीबरोबर चालता झालों. तुम्ही कोठी वगैरे सर्व सामान घेऊन स्वारींत येऊन दाखल व्हावें. "

इंग्रजसरकारचे त्या वेळचे एक प्रतापी व नामांकित सेनापती जनरल वेलेस्ली ह्मणजे ज्यांना पुढें सन १८१५ इसवी सालीं फ्रान्स देशांत वाटरलू येथें फ्रेंच लोकांचा त्या वेळचा महान प्र-

तापी व दिग्विजयी पाहइन्शाहा (महाराजाधिराज) नेपोलियन् बोनापार्ट याजबरोबर विकट लढाई करून पूर्ण व कायम असा जय मिळविला व ज्यांस त्या बाहादुरीबद्दल त्यांचे सरकाराकडून " ड्युक ऑफ वेलिंग्टन् " असा मोठा खिताब मिळाला, त्यांनीं पूर्वीं इतर साहेब लोकांबरोबर हिंदुस्थानांतील कारस्थाने व लढाया यांचे संबंधानें केलेल्या पत्रव्यवहाराचे कित्येक व्हाल्युम (एकच विषयाचीं अनेक बुकें) अलिकडे इंग्रजीत छापून प्रसिद्ध झाले आहेत: त्यांपैकीं पहिले व्हाल्युमाचीं पृष्टें ३३७ व ४१७ यांत सन १८०३ चे आगस्ट महिन्यात झालेला पत्रव्यवहार दाखल असून त्या पत्रव्यवहारात विंचूरकर यांजविषयीं मजकूर लिहिले आहेत ते येणेंप्रमाणें;—

PAGE 337.

"In fact, this Chief is the only one in the Empire who has been, from the commencement, faithful to the cause of the Peishwa. While fighting in this cause against Holkar, his troops were entirely cut to pieces, he and his son were wounded, and Oolpar alone remained of all what he possessed and this was ceded to the Company. I certainly think it desirable that this Chief should get back that district. I acknowledge that I think it would be preferable to suffer a little inconvenience at Surat and to attach to the British Government's connection such a servant as Vithal Shiodeo to gain credit in the Maratha Empire of rewarding his services and fidelity to his Master, to keeping the district only for the convenience of the City of Surat."

PAGE 417.

"Your are already in the possession of my opinion respecting Oolpar. Vithal Shiodeo must have that district, and that immediately.

सदर्हू दोन्ही मजकूरांचा मराठी तरजमा येणेंप्रमाणें;—

पृष्ट ३३७

वस्तुतः (संपूर्ण) मराठी राज्यांत पेशव्यांचे पक्षाशीं इमानदारीनें वागलेला असा काय तो हाच एकटा सरदार आहे. पेशव्यांचे तर्फेनें होळकरांबरोबर लढत असतां, त्याचे स्वारांचे भगर्दीं पुर्जे पुर्जे उडून त्यास व त्याचे पुत्रास जखमा लागल्या, आणि त्याचे कबजात जो मुलूक होता त्यापैकीं फक्त उरपाड मात्र शिल्लक राहिला; पण तोही (पेशव्यांकडून) कंपनीस देण्यांत आला. तो माहाल त्यास परत मिळणें हें मला खचीतच इच्छास्पद वाटतें. हे मी कबूल करितों कीं फक्त सूरत शहराचे सोयीकरितां तो माहाल राखून ठेवण्यापेक्षां, त्या शहरांत जरा गैरसोय सोसावी आणि त्यानें आपले मालिकाबरोबर इमानदारीनें वागून त्याची अनेक कार्यें सिद्धीस नेलीं त्याबद्दल त्यास बक्षीस देण्याची मराठी राज्यांत कीर्ति मिळविण्यास्तव विठ्ठल शिवदेव (नरसिंह खंडेराव) यासारिखे नौकराचा इंग्रजसरकाराशीं संबंध जोडणें हें अधीक पसंद होईल असें मला वाटतें.

पृष्ठ ४१७

" उरपाडाविषयीं माझें मत तुह्मांस पूर्वींच कळलें आहे. विठ्ठल शिवदेव यांस तो माहाल मिळणें अवश्य आहे; व तो आतांच मिळाला पाहिजे. "

मागें सांगितल्याप्रमाणें बाजीराव पेशवे हे आपली राजधानी पुणें शहर निराश्रित स्थितींत सोडून गेले! हें केवळ संपुर्ण मराठी राज्याच्या ऱ्हासाचें पूर्वरूपच होय असें मानण्यास हरकत नाहीं; तथापि त्यांनीं ह्या गोष्टीचा बिलकुल विचार केला नाहीं. ते नरसिंहराव यांस सात हजार स्वारानिशीं बरोबर घेऊन निघाले. ते प्रथम सिंहगडास गेले. खासास्वारी बालेकिल्ल्यांत गेली. नरसिंहराव बरोबरचे फौजेसह खालीं किल्ल्याचे माचीवर मुक्काम

करून राहिले. त्यांचे कारभारी हे त्यांची बाकीची खासगी फौज व दरोबस्त असबाब घेऊन तेथें आले. दुसरे दिवशीं पेशव्यांचीही सुमारें पांच हजार फौज येऊन दाखल झाली. सिंहगडावर दोन दिवस मुक्काम झाला. त्या वेळेसही नरसिंहराव यांनीं तेथून न हालण्याविषयीं पुष्कळ तऱ्हेनें श्रीमंतांची समजूत केली. परंतु त्यांस धैर्य येईना. शेवटीं ते कोणाचेंही न ऐकतां तेथून निघून माहाड व रायगड वगैरे ठिकाणीं गेले; परंतु तेथेंही होळकराची फौज आल्याचें वर्तमान त्यांस लागतांच, ते समुद्रकिनाऱ्यावरील सुवर्णदुर्ग नांवाचे मजबूत किल्ल्यावर गेले. तेथून वसईस जाण्यापूर्वी त्यानीं जरीपटका ह्मणजे राज्याचा मुख्य जरीचा झेंडा व मुतालीकी शिक्का ह्मणजे नायबीची मोहोर ही नरसिंहराव यांचे हवालीं करून त्यांस अशी आज्ञा केली कीं, " तुम्हीं सरकारी सर्व फौज जमाकरून नीट मिरजेस जावें, आणि तेथें इंग्रजसरकारची फौज येईल तिला मिळून, होळकरानें दंगा केल्याबद्दल त्यास शिक्षा करण्याकरितां त्या फौजांबरोबर पुण्यास निघून जावें. " त्याबरहूकम नरसिंहराव यांनीं पेशव्यांची पुण्यानजीक पांगलेली फौज एकत्र करून आपले फौजेनिशीं मिरजेकडे कूच केला; परंतु पाटण खोरें नांवाच्या एका खिंडींत सातारचे राजाचा कोणी जवळचा आप्त चतुरसिंग भोंसलें हा त्यांस आडवा आला. तेव्हां तो अडथळा दूर करण्यासाठीं त्यांस तेथें मुक्काम करणें भाग पडलें. मग त्यांनीं चतूरसिंगावर मारुळबहुल्याजवळ झपाटयानें हल्ला करून त्याचा अगदीं मोड केला. नंतर पुनः कूच करून ते बिनहरकत मिरजेस पोहोंचले, आणि तेथें तळ देऊन इंग्रज सेनापति वेलस्ली साहेब हे कवाइती फौज घेऊन येणार होते त्यांची वाट पाहात राहिले. पुढें सन १८०३ इसवी सालीं बाजीरावसाहेब यांनीं इंग्रज सरकाराबरोबर तह केल्यावरून ते सेनापति इंग्रजी फौजेसुद्धां मिरजेस आले. तेव्हां नरसिंहराव यांनीं त्यांस भेटून आपला तेथें

राहाण्याचा हेतू कळविला. मग उभयतां सेनापतींनीं आपापल्या फौजांनिशीं पुण्याकडे कूच केला. पण बाजीरावसाहेबांकडून यशवंतराव होळकरांची समजूत न झाल्यामुळें ते तें शहर लुटून, मिरजेहून दसई फौज येण्यापूर्वींच तेथून निघून गेले होते.

वसई येथें तह झाल्यावर बाजीराव पेशवे हे बरोबर १२०० गोरी फौज व १३०० काळी फौज घेऊन पुण्यास परत आले. तेथें वेलेस्ली साहेब, नरसिंहराव विंचुरकर, बापू गोखले, निपाणकर वगैरे सरदार त्यांस भेटले. बाजीराव यांनीं वेलेस्ली साहेब, निपाणकर आप्पा देसाई आणि बापू गोखलें यांस होळकराचा पाठलाग करण्याकरितां पाठवून नरसिंहराव यांस पुण्यास ठेवून घेतलें. याप्रमाणें श्रीमंत पुण्यास आल्यानें तेथें स्वस्थता होऊन पूर्वीप्रमाणें राज्यकारभार चालूं लागला; परतु त्या वेळेपासून मराठी राज्याचा प्रताप नष्ट होऊन त्याचे ऱ्हासास आरंभ झाला. सन १८०२ इसवी सालापासून मराठी राज्यांत पुष्कळ बंड उद्भवली होतीं; पेंढाऱ्यांच्या टोळ्याही पुष्कळ उठल्या, व अनेक प्रकारचीं राजकारणें उपस्थित होऊन सर्वत्र बखेडे माजले. त्यामुळें महाराष्ट्र देशाचे उत्तर सीमेवरील प्रदेशांत व निजामांचे पश्चिम हद्दीवरील प्रांतांत बेबंदी होऊन मुलूक उद्ध्वस्त झाला. तेणेंकरून शेतांची लागवड बिलकूल झाली नाहीं. या कारणानें सन १८०४।५ इ. सालीं भयंकर दुष्काळ पडला. तेव्हां इंग्रज सरकारानें पेंढारी लोकांची धामधूम मोडून सर्व दंगेधोपे नाहींसे करण्याकरितां व उद्ध्वस्त झालेल्या मुलुकाची पेशव्यांचे वतीनें आबादी करण्याकरितां कर्नल वालेस साहेब यांची योजना केली; आणि त्यांचे मदतीस कोणी सरदार पाठविण्याविषयीं पुणें येथील रेसिडेंटानीं पेशव्यांस विनंती केली. त्यावरून बाजीराव साहेब यांनीं नरसिंह खंडेराव यांचे स्वाधीन जरीपटका व मुतालिकी शिक्के केलें आणि हुजुरातीपैकीं कांहीं फौज त्यांचे हाताखालीं देऊन, त्यांस वालेस साहेबांचे मदतीस पाठविलें. त्याचप्रमाणें निजाम यांजकडूनही महिपतराम,

सुभानखान व सखोरुद्र या नांवाचे सरदार कांहीं कवाइती पलटणीनिशीं एका इंग्रज कामगाराबरोबर आपले सरहद्दीवर आले. नंतर वालेस साहेब व नरसिंहराव यांनीं खानदेशांत व वऱ्हाडचे पश्चिम भागांत होळकरांकडील फौजबंद दंगेवाले व पेंढारी व भिल्ल यांचें पारिपत्य करून मुलकाची अबादी केली. तसेंच निजामांचे सरदारांनींही तिकडून आलेल्या इंग्रज सरदाराच्या साहाय्यानें सर्व प्रकारचे दंगे मोडून आपले हद्दींत स्वस्थता केली. त्या वेळेस नरसिंहराव यांचे फौजेचे खर्चाकरितां सर्व गंगथडी, बागलाण, खानदेश व वऱ्हाडचे पश्चिम भागापैकीं कांहीं प्रांत, येणेंप्रमाणें मुलूक लावून दिलेला होता. तेथें ते उत्तम प्रकारची व्यवस्था ठेवून वसूल घेत असत. याप्रमाणें सन १८०८ इसवीचे आरंभापर्यंत क्रम चालला.

वर लिहिल्याप्रमाणें नरसिंहराव हे दंग्याचा बंदोबस्त करून मुलुकांत स्वस्थता करण्यामध्यें गुंतल्यामुळें त्यांचे उत्तर हिंदुस्थानांतील मुलुकांची व्यवस्था नीट राहिली नाहीं; आणि अंबाजी इंगळे, ज्यानबत्तीस व दतियेवाले राजे यांनीं त्यांचा मुलूक त्यांचे कामगारांचे हातून हिसकावून घेऊन तीन चार वर्षेंपर्यंत त्याचा वसूल घेतला. तो मुलूक परत घेण्यासाठीं त्यांनीं उत्तर हिंदुस्थानांत जाण्यास पेशव्यांची परवानगी मागितली. ती मिळाल्यावर त्यांनीं त्या प्रांतीं जाण्याची तयारी केली. त्यावेळेस त्यांचे पदरची मंडळी व इतर इष्टमित्र यांस अशी उमेद वाटली कीं, ते उत्तर हिंदुस्थानांत गेल्यावर स्वतःचा मुलूक सोडवून घेतीलच; परंतु साधलें असतां शिंदे व इतर राजे रजवाडे यांस अनुकूळ करून घेऊन कांहीं तरी मोठें राजकारण उभें करतील; आणि त्या योगानें पेशव्यांचें पंजाबांतील नष्ट झालेलें वर्चस्व कदाचित् पुनः स्थापितील; परंतु दुर्दैवेंकरून त्या उमेदी जागच्या जागींच राहिल्या. कारण नरसिंहरावांची प्रकृति एकाएकीं बिघडून त्यांस नवज्वराची भावना झाली. हें वर्तमान बाजीराव

साहेब यांस कळल्यावरून, ते स्वतः नरसिंहराव यांचे समाचारास गेले, व त्यांनीं वैद्यांकडून औषधोपचारही करविले; परंतु जरा देखील गुण पडेना, आणि त्यांची प्रकृति तर उत्तरोत्तर अधिकाधिक थकत चालली. हें पाहून कारभारी मंडळींनीं त्यांस दत्तक देण्याचा विचार काढिला; परंतु त्या समयीं नरसिंहराव यांचें वय केवळ चोवीस वर्षांचें असल्यामुळें त्यांस दत्तक घेण्याची सूचना करण्यास कोणाचेंही धैर्य होईना; तथापि ही गोष्ट कारभारी यानीं श्रीमंतांचे कानावर घातली. तेव्हां त्यांचे ह्मणणें पडलें कीं, " या समयीं नरसिंहराव यांस अशी गोष्ट कळविणें प्रशस्त नाहीं. ईश्वर तसा प्रसंग बहुधा आणणार नाहीं; पण कदाचित् आलाच तर पुढें त्याचा विचार पाहातां येईल. " पुढें दोन दिवसांनीं नरसिंहराव यांची प्रकृति अतिशय बिघडून त्यांस सन १८०८ इ. चे एप्रिल महिन्यांत ह्मणजे शके १७२९ चैत्र शुद्ध ४ रोजीं पुणें येथें देवाज्ञा झाली. नंतर कारभारी मंडळी यानीं आळंदी येथें इंद्रायणी नदीचे तीरीं त्यांच्या एका जवळच्या आप्ताकडून त्यांची उत्तरक्रिया यथासांग करविली. पुढें विंचूरकरांचे मोठेपणास योग्य अशा प्रकारें पेशवे व इतर इष्टमित्र यानीं त्यांच्या कुटुंबाचें समाधान केलें.

नरसिंहराव यांस दोन स्त्रिया होत्या. प्रथम स्त्री अहमदाबाद येथील सरसुभे भवानी शिवराम काळे यांची कन्या होती. ती निवर्तल्यावर खुरू या आडनांवाचे प्रसिद्ध गृहस्थाचे कन्येशीं त्यांचा विवाह झाला. नरसिंहराव यांचे मरणसमयीं त्या बाईस नुकताच ऋतुप्राप्त झाला होता. त्या बाईचें नांव रमाबाई होतें. सन १८०८ इ. चे आगष्ट महिन्यांत कारभारी बाळोबाबावा वगैरे ह्यांनीं श्रीमंतांच्या परवानगीनें ह्याच बाइच्या मांडीवर दत्तक देऊन विंचूरचें संस्थान त्या दत्तकाच्या नांवानें चालविलें. यासंबंधीं सर्व हकीकत पुढें विठ्ठलराव नरसिंह यांच्या चरित्रांत आढळून येईल. सन १८१८ इसवी सालीं म्हणजे दक्षिणेंत इंग्रजी अंमल होण्यापूर्वीं दोन वर्षें ह्या बाई

यमाजीपंत अण्णा सालकाढे, विंचुर संस्थानचे पोतनीस, यांस बरोबर घेऊन काशीयात्रेस निघाल्या. तेव्हां त्यांजबरोबर पागा वगैरे इतमाम होताच. शिवाय त्यांनीं धर्मार्थ स्वतःचे खर्चानें पुष्कळ यात्रा बरोबर नेली होती. प्रथम नर्मदातीरीं ओंकारेश्वर येथील व नंतर उज्जनी येथील महाकाळेश्वराची अशा यात्रा करून त्या बाई ग्वाल्हेरीस गेल्या. त्या वेळेस विंचूरकरांचे वकील गणेश राजाराम हे पागा वगैरे सरंजाम घेऊन बाईस चार मजला सामोरे आले. दौलतराव शिंदे यांजकडूनही एक मोठा कामगार त्यांस सामोरा आला. त्यांनें मोठ्या सत्कारानें त्यांस ग्वाल्हेरीस नेल्यावर शिंद्यानीं त्यांस सर्व यात्रेसुद्धां एक महिनाभर ठेवून घेतलें. तेथून त्यांनीं त्रिस्थली यात्रेस जाऊन मोठ्या खर्चानें सर्व मंडळीसह ती यात्रा केली. पुर्वी काशी येथें काळभैरबाचें मंदिर लाहान होतें; तें त्यांनीं उस्तरून यमाजीपंत अण्णाचे मार्फत नवीन बांधिलें. त्या मंदिराचे मागील बाजूचे भिंतीवर यमाजीपंत अण्णानीं शिलालेख स्थापन केला आहे तो येणेंप्रमाणें:—

श्रीमानंडभैरवायनमः ॥ श्रीमत्काशी पुराधिशो भैरवः पापभक्षकः ॥ अन्वर्थनामा भगवान्पायाद्भक्तजनं स्वयं ॥ १ ॥ श्रीमद्दक्षिणदिग्राजशाहोः सातारवासिनः ॥ पेशवोपाभिधो मुख्य प्रधानस्सु प्रतापवान् ॥ २ ॥ बाजीरावः पुण्यपुराधीशस्तस्य चमुपतेः ॥ नृसिंहस्यरमाभर्तूर्विंचूरग्रामवासिनः ॥ ३ ॥ कोशाध्यक्षो लौहिताख्यगोत्रोनारायणात्मजः ॥ ऋकशाखी यमुनापुत्रौ यमाजी पंडितः कृती ॥ ४ ॥ कालभैरवनाथाय मंदिरं सुमनोहरं ॥ नवीनं कारयित्वात्र भक्त्या तस्मैसमर्पयत ॥ ५ ॥ संवत् १८७४ श्रावण शुद्ध ८ शके १७३९.

अर्थ—"जो काशी क्षेत्राधिपति असून पापभक्षक हें यथार्थ नाम ज्यास आहे, असा काळभैरब भक्तजनांचें स्वतः रक्षण करो. सातारा नांवाच्या शहरांत वास्तव्य करणारा आणि दक्षिण देशाधिपति असा शाहुराजाचा पेशवे उपनामाचा पराक्रमी मुख्य प्र-

धान बाजीराव पुण्याचे गादीवर असतां त्यांचे सेनापति रमाबाईचे भ्रतार नरसिंहराव विंचुरकर यांचे पोतनीस नारायणराव यांपासून सौभाग्यवती यमुनाबाईचे पोटीं जन्मलेले, ऋग्वेदी आणि ज्यांचें गोत्र लोहित, असे लोकमान्य जे यमाजीपंत त्यांनीं या क्षेत्रांत नूतन मंदिर तयार करवूत संवत् १८७४ शके १७३९ श्रावण शुद्ध ८ रोजीं परमभक्तीनें श्री कालभैरवनाथ याकरणें समर्पण केलें."

शिवाय त्यांनीं कालभैरवाचे मंदिराजवळच एक शिवमंदिर बांधिलें. या प्रमाणें सर्व यात्राविधि आटपल्या नंतर त्यांनीं देशीं परत येण्याची तयारी केली. तों पेशवे मालकम साहेबांचे स्वाधीन होऊन दक्षिणेंत इंग्रजी अम्मल झाल्याची वार्ता त्यांस कळली; तेव्हां त्या उदास होऊन पुनः तीर्थयात्रा करण्यास निघाल्या; आणि मथुरा, गंगोत्री, केदार व नारायण ह्या यात्रा करून गंगातीरानें प्रयागास आल्या. तेथें विठ्ठलराव नरसिंह यांजकडून त्यांस आणण्याकरितां कारकून वगैरे गेले. त्यांजबरोबर त्या विंचुरास आल्यावर विठ्ठलराव नरसिंह यांनीं त्यांचा उत्तम प्रकारें बंदोबस्त ठेविला; तत्रापि, आपण स्वतंत्र नेमणूक करून घेऊन तिजबद्दल निराळे गांव तोडून घ्यावे अशी त्यांस इच्छा प्राप्त झाली; परंतु ती सिद्धीस न गेल्यामुळें त्या वेळचे गव्हरनर एल्फिनस्तन् साहेब यांजकडून आपले इच्छेप्रमाणें बंदोबस्त करूनघ्यावा म्हणून त्या पुण्यास गेल्या. पण त्यांचा तो उद्देश शेवटास न जातां शके १७४३ माघ शुद्ध १५ म्हणजे सन १८२२ इसवी सालीं पुणें मुक्कामीं त्या बाईस देवाज्ञा झाली.

मरणकालीं नरसिंहराव याची उमर पुरी पंचवीस वर्षांचीही नव्हती. होळकरांशीं लढाई झाल्यापासून म्हणजे आपले वयाचे १९ वे वर्षापासून ते स्वतंत्रपणें अधिकार चालवूं लागले. पुढें पांच साहा वर्षें पर्यंत जे दंगे धोपे चालले त्यांचा बंदोबस्त करण्यांत, व एकंदरीनें पाहातां, त्यांचे ते वय फिकीरींतच

गेलें, यामुळें त्यांचे हातून विशेष लिहिण्यासारखें मोठें धर्मकृत्य झालें नाहीं; परंतु ते दरवर्षास कशीही अडचण असली तरी फुरसत करून आपला कुलस्वामी नरहरी याचें दर्शनास्तव नरसिंहपुरास जात असत. तेथें किमानपक्ष पंधरा दिवस तरी मुक्काम करून ते दररोज देवाची माहापूजा करीत; व मुक्तद्वार ठेऊन ब्राम्हणभोजन घालीत. त्यांनीं नरहरीस उत्तम प्रकारचें जवाहीर दिलें, त्यांपैकीं अद्यापपर्यंत कांहीं कायम असून तें सणावाराचे दिवशीं देवाचे आंगावर घालण्यांत येतें.

नरसिंहराव हे फार गोरे असून सुस्वरूप होते. त्यांची आंगकाठी उंच व भव्य होती. हरएक प्रकारें त्यांची ऐंट शिपाईगिरीची असे. शरीर जाडें असून ऐंटदार होतें. ते नेहेमीं बाराशें जोर काढून दोन घोड्यांचा फेरफटका केल्याशिवाय कधींही राहत नसत. त्यांची मुदगलांची जोडी अद्याप पर्यंत विंचुर येथें आहे. ती पेलणारा पुरुष सांप्रत क्वचितच आढळेल. त्यांचा आहारही तसाच मोठा होता. ते पांच शेर दूध पिऊन शिवाय दुवक्ता सर्वांबरोबर भोजन करीत असत. त्यांनीं आपलें शरीर परकीय मनुष्यास उघडें कधींही दाखविलें नाहीं. सर्वकाल आंग आच्छादित ठेवीत असत. ते परस्त्रीस केवळ मातेप्रमाणें मानीत. त्यांचा स्वभाव अत्यंत मानी असे. या दोन गोष्टींचीं दोन उदाहरणें खालीं लिहितों.

ते एके दिवशीं श्रीमंत बाजीराव साहेब यांजबरोबर एकांतांत कांहीं गोष्टी बोलत असतां, विनोदास्तव श्रीमंत कांहीं दुसरे कामाचे निमित्त करून सत्वरच परत येण्याचे उद्देशानें उठून गेले. नंतर प्रसिद्ध दिक्षितीण बाई तेथें आली; आणि तिनें नरसिंहरावांची थट्टा करून त्यांचे आंगरख्यास हात लाविला. तेव्हां नरसिंहराव यांचा चेहरा बदलला आणि त्यांनीं तरवारीस हात घालून ती अर्धी बाहेर काढिली! तेव्हां ती बाई भयाभीत होऊन तेथून सत्वर निघून गेली. हें वर्तमान श्रीमंतांस समजतांच त्यांनीं दुसरे दिवाणखान्यांत जाऊन

एक हुजऱ्याबरोबर नरसिंहराव यांस असा निरोप पाठविला कीं, "तुह्मीं आतां घरीं जावें." त्या प्रमाणें नरसिंहराव घरीं गेल्यावर त्यानीं श्रीमंतांस अशी विनंति सांगून पाठविली कीं, "अमर्याद रीतीनें सेवा करण्यास मी नाराजी आहें; माझे पूर्वजांनींही अमर्यादेनें वर्तून सरकारची सेवा केली नाहीं; व मी ही करणारा नव्हे. हें स्वामीस बरें न वाटेल तर मला रजा द्यावी. मी नौकरी सोडण्यास तयार अहें."

दुसरी गोष्ट अशी कीं, सदाशिव माणकेश्वर हे शेवटचे बाजीराव यांचे कृपेनें पुष्कळच वाढून पेशवाईचा सर्व कारभार पाहूं लागले. त्यांशीं नरसिंहराव हे बांकून राहत असून, आपलें कोणतेंही काम त्यांस न समजावितां हुजूर श्रीमंतांचे कानावर घालून त्याचा निकाल त्यांकडून लावून घेत असत. त्यामुळें माणकेश्वर यांस वैषम्य वाटे. परंतु नरसिंहराव यांचे तेजापुढें त्यांचा इलाज चालेना. माणकेश्वर हे दरवर्षास आपलें वतनाचें गांव टेंभुर्णी येथें जात असून, बरोबर कोण्या तरी सरदाराची पागा नेत असत. एके वर्षी त्यांनीं श्रीमंतांस अशी विनंति केली कीं, "या सालीं विंचुरकरांकडील पागा बरोबर घेऊन जाण्याविषयीं आज्ञा असावी." श्रीमंतानीं तसें करण्याविषयीं त्यांस रुकार दिला आणि नरसिंहराव यांस असा हुकूम पाठविला कीं, "तुह्मीं आपले फौजे पैकीं दोन पागा माणकेश्वरांबरोबर पाठवाव्या." या हुकुमाचें उत्तर नरसिंहराव यांनीं वकिलाबरोबर पाठविलें कीं, "माणकेश्वरांबरोबर आमची फौज कधींही जाणार नाहीं. दुसरा कोणी पुरातन सरदार अगर मुत्सद्दी याजबरोबर ती पाठविण्याविषयीं मला हुकूम होईल तर मी ती पाठवीन इतकेंच नाहीं, तर, स्वतः सुद्धां जाईन. माणकेश्वर हे प्राचीन सरदार अगर मुत्सद्दी नसून केवळ दैवानेच उदयास आले आहेत. त्यांचे हुकूमतीखालीं फौज देणें हें मला योग्य वाटत नाहीं. याबद्दल माफी असावी."

विठ्ठलराव नरसिंह यांचें चरित्र.

प्रकरण १ लें.

वर नरसिंह खंडेराव यांचे देहांताचा वृत्तांत लिहिण्यांत आला. आतां आह्मी विठ्ठलराव नरसिंह यांचें चरित्र लिहिण्यास आरंभ करितों.

नरसिंहराव यांचें प्राणोत्क्रमण झालें त्या वेळेस त्यांस पुत्र संतति झालेली न०हती; सबब त्यांचे मुख्य कारभारी बाळोबा बाबा, फौजेवरील मुख्य अधिकारी बाबूराव नाना कोटमगांवकर व वकील काशीपंत बाबा जोगळेकर, शिवाय फौजेंतील पुरातन सरदार वगैरे पुष्कळ मंडळी यांनीं जमून आतां पुढें कशी व्यवस्था करावी, ह्याविषयीं विचार केला. त्यांत नरसिंहराव यांची स्त्री रमाबाई यांस दत्तक देऊन पूर्ववत् संस्थान चालवावें असें ठरलें; परंतु प्रथम तसें करण्यास श्रीमंत बाजीरावसाहेब यांची परवानगी मिळविणें अवश्य होतें. सबब बाळोबा बाबा व काशीपंत बाबा या उभयतांनीं श्रीमंतांची भेट घेऊन त्या बाबदींत त्यांस विनंति केली. तेव्हां श्रीमंतांची आज्ञा झाली कीं, "हा सर्व मजकूर तुम्हीं सदाशिवपंत भाऊ माणकेश्वर यांस कळवावा, म्हणजे या संबंधानें काय व्यवस्था करावयाची ती ते सांगतील." त्यावरून ते उभयतां माणकेश्वर यांजकडे गेले. पूर्वीपासून विंचुरकर यांचे दौलतीविषयीं माणकेश्वर यांस वैषम्य वाटत होतेंच. तशांत कालगतीनें विंचुरकर यांचे बरेंवाईट करण्याचा अधिकार त्यांजकडे आला. मग काय विचारावें ? "अगोदरच उल्हास, त्यांत फाल्गूनमास" अशी लोकांची म्हण आहे, त्याप्रमाणें त्यांनी विंचूरकर घराण्याचें नुकसान करण्याचा निश्चय करून, बाळोबा बाबा यांस असें सांगितलें कीं, "सांप्रत सरकारांत खालसा मुलूक फार थोडा राहिला आहे; तशांत हालीं इंग्रजांकडील फौज दरबारांत चाकरी करीत असल्यामुळें सरकारास पूर्वीप्रमाणें जुन्या फौजेची गरज राहिली नाहीं. शिवाय कितीएक कारणांस्तव श्रीमंत द-

त्तक घेण्यास परवानगी देतील असें मला वाटत नाहीं. तथापि तुम्हांकरितां मी त्यांस विनंति करण्यास आळस करणार नाहीं. ''

या कामीं माणकेश्वर यांजकडे येण्याजाण्यांत बाळोबा बाबा व काशीपंत बाबा यांचे दोन महिने गेले; परंतु माणकेश्वर यांनीं त्यांस कधीं धरसोडीचे व कधीं टाळाटाळीचे जबाब देऊन त्यांस बहुत रंजीस केलें. शेवटीं त्यांचा नाद सोडून खुद्द श्रीमंत यांसत्र पुन्हा विनंति करावी असा बाळोबा बाबा यांनीं निश्चय केला. मग बाजीराव साहेब एके दिवशीं खुषींत असतां, बाळोबा बाबा व काशीपंत बाबा यांनीं तेथें जाऊन त्यांस विनंति केली कीं, '' विठ्ठल शिवदेव यांनीं थोरले बाजीराव साहेब, चिमाजी आपा साहेब, नाना साहेब व दादा साहेब यांची समयोचित नौकरी कशी बजाविली, व त्यांचे पुत्र शिवाजी विठ्ठल हेही सरकारचे किती उपयोगीं पडले हें सरकार जाणत आहेच; तसेंच नरसिंहराव यांनीं शूरत्वाचीं कामें कसकशीं केलीं, हें श्रीमंतांनीं प्रत्यक्ष पाहिलेंच आहे. आतां त्यांचें नांव पुढें चालावें अशी आम्हांसर्वांची अंतःकर्ण पूर्वक इच्छा आहे. ती पूर्ण करण्याची मालिकांनीं कृपा न-केली तर, स्वर्गीं श्रीमंत दादासाहेब हे काय म्हणतील याचा जरा विचार व्हावा, आणि मग या संबंधानें जी आज्ञा होणें असेल ती व्हावी. अतःपर आह्मी माणकेश्वर यांजकडे जाणार नाहीं. '' त्याजवर बाजीराव साहेब बोलले कीं, '' तुम्हीं जें कांहीं विदित केलें तें मी जाणत आहें. विठ्ठल शिवदेव हे आमचे वडील दादा साहेब यांचे केवळ आत्मलिंगच होते यांत संशय नाहीं. नरसिंहराव यांनींही माझी सेवा अंतःकरणापासून केली आहे. याकरितां विंचुरकरांचें संस्थान पूर्ववत् चालविण्यांत मजकडून बिलकूल कसर होणार नाहीं. तुम्हीं दत्तक घेण्याकरितां मुलगा पाहून आणावा. नजराणा मात्र रीतीप्रमाणें दिला पाहिजे. माणकेश्वर यांचें मत असें आहे कीं, किमानपक्ष दाहा लक्ष रुपये तरी नजराण्याबद्दल घेतले पाहिजेत. याविषयीं मात्र तुमचें ह्मणणें

काय आहे तें कळवावें." त्याजवर त्या उभयतांनीं विनंति केली कीं, "आमचे मालिकांचे दौलतींत आजपर्यंत कधींही शिलक राहिली नाहीं. रास्ते, राजेबाहादर, वगैरेंची जशी शिलक बाळगण्यासारखी स्थिति आहे, त्याप्रमाणें आमचे मालिकांची कधींही नव्हती; इतकेंच नव्हे, तर, सांप्रत विंचुर संस्थानास कर्जही आहे; पाहिजे असल्यास याबद्दल चवकशी व्हावी. विठ्ठल शिवदेव यांचे घराण्यापासून नजराणा घेणें हें श्रीमंतांस उचित वाटत असेल तर सर्व संस्थान सरकारचेंच आहे; पाहिजे तें त्यांतून घ्यावें." त्याजवर श्रीमंत बोलले कीं, "निदान तीन लक्ष रुपये तरी नजराण्याबद्दल तुम्हास द्यावे लागतील. हाल्लीं तुह्मांपाशीं शिलक नसल्यास तुह्मीं उभयतांनीं चिठ्ठी लिहून द्यावी. थोडक्यांच दिवसांत ती चिठ्ठी मी तुम्हास परत देईन; पण या वेळेस तुम्हीं नाहीं ह्मणूं नकां." तेव्हां उभयतांनीं आज्ञेप्रमाणें लागलीच चिठ्ठी लिहून दिली. नंतर श्रीमंतांनीं कारकुनाबरोबर माणकेश्वरांस सांगून पाठविलें कीं, "विंचुरकर यांस दत्तक घेण्याची मी परवागी दिली आहे; व नजराण्याबद्दल त्यांच्या कारभाऱ्यांनीं मुदतीची चिठ्ठी लिहून दिली आहे, त्याप्रमाणें कागदीं जमाखर्च व्हावा." हें झाल्यावर बाळोबा बाबा यांनीं विंचुरकरांचे निकट भाऊबंदांचे घराण्यांतील चार पांच मुलगे पसंद करून पेशव्यांचे भेटीस नेले. त्यांत गोपाळ परशुराम यांचे ज्येष्ट चिरंजीव दाहा वर्षांचे उमरीचे होते, त्यांची चलाखी व मुखावरील तेज पाहून श्रीमंतांस संतोष वाटला. तेव्हां "या मुलाचा विद्याभ्यास किती झाला आहे?" असें श्रीमंतांनीं विचारिलें. त्यावरून त्यानें श्रीमंतांचे हुजूर एक बंदभर मजकूर बिनचूक लिहून दाखविला; व शिवाय तोंडीं पुसलेले हिशेबांचीं ही उत्तरें तात्काळ सांगितलीं. तसेंच जोशाकडून आलेले सर्व मुलांच्या टिपणांचा विचार करितां त्यांत या मुलाचे ग्रह उत्तम ठरले. खेरीज याची सामुद्रिक लक्षणेंही उत्तम प्रकारचीं आहेत,

असें दिसून आल्यावरून हाच मुलगा नरसिंहराव यांचे मागें सरदारीस कायम करावा असें सांगून श्रीमंतांनीं बाळोबा बाबा यांस निरोप दिला. नंतर नरसिंहराव यांचें कुटुंब रमाबाई ह्या तुळापुरास जाऊन ब्राह्मणधर्माप्रमाणें शेष राहिलेला तीर्थविधि करून परत आल्या.

पुढें कारभारी मंडळीनें त्या मुलास शुभमुहूर्तावर रमाबाईसाहेब यांचे मांडीवर देऊन त्याचें दत्तविधान करविलें. या दत्तविधानाचे वेळेस पदरचे सर्व सरदार, मुत्सद्दी, गांवांतील सभ्य गृहस्थ व शेट सावकार वगैरे यांनीं आहेर केले. त्याचप्रमाणें श्रीमंतांकडूनही सदाशिव माणकेश्वर यांनीं आहेर केला. नंतर सर्व संस्कार मोठ्या समारंभानें शेवटास गेला. दत्तक घेतलेल्या मुलाचें मुळचें नांव केशवराव असें होतें; परंतु दत्तक घेणाऱ्या मातुश्रीनीं त्याचें तें नांव बदलून विठ्ठलराव असें ठेविलें; आणि रीतीप्रमाणें साखर वाटविली. नंतर कारभारी यांनीं त्या समारंभास आलेल्या सर्व मंडळीस शिष्टसांप्रदायाप्रमाणें अत्तर, गुलाब व पानसुपारी देऊन विदा केलें. पुढें कारभारी यांनीं स्वारीची तयारी करून नवीन दत्तक झालेल्या मुलास मोठ्या थाटानें श्रीमंतांचे दर्शनास नेलें, आणि त्याजकडून श्रीमंतांस साष्टांग नमस्कार घालविला. श्रीमंतांनीं बहुत संतुष्ट होऊन, माणकेश्वर वगैरे मुत्सदी मंडळी दरबारांत हाजिर असतां, विठ्ठलराव यांस मोठ्या उत्साहानें सरदारीचीं वस्त्रें व माहालांच्या सनदा दिल्या; आणि थोडक्याच वेळानें त्यांस कारभाऱ्यांबरोबर घरीं परत पाठविलें. नंतर कारभारी यांनीं विठ्ठलराव यांजकडून पुणें शहरांतील प्रसिद्ध देवांचीं दर्शनें करविलीं. ते घरीं आल्यावर त्यांनीं खासगी मंडळीचा मोठा दरबार भरविला; आणि त्यांत विठ्ठलराव यांचे हातानें कित्येक मंडळीस पोषाग देवविले; कितीएक ब्राह्मण मंडळीस वर्षासनाच्या सनदा देवविल्या; आणि सर्वांस पानसुपारी देऊन दरबार बरखास्त केला.

विठ्ठलराव हे त्यावेळेस कारकूनी विद्येंत बरेच प्रवीण होते. त्यांजकडून सरदारीस योग्य अशा प्रकारचा आभ्यास, म्हणजे

घोड्यावर बसून फेरफटका करणें, बोथाटी करणें, बंदुकीनें शिस्त धरून निशाण मारणें, वगैरे गोष्टी करविण्यास्तव कारभारी यांनीं पदरचे मानकरी मंडळींतील पांडोबा सोळसकर या नांवाच्या एका गृहस्थाची नेमणूक केली. सदर्हू मनुष्य शिपाईगिरीचे सर्व कसबांत मोठा प्रवीण होता. तसेंच त्यांजकडून तालीम करविण्यांस त्यानीं एका उत्तम वस्तादाची योजना केली; आणि इतर विद्या व कला शिकविण्याकरितांही एक उत्तम मनुष्य नेमुन त्याजकडून उत्तम प्रकारें अभ्यासाचा क्रम चालविला.

फौजे संबंधी सर्व व्यवस्था बाबूराव नाना हे पाहातच होते. दौलतीचा कारभार, म्हणजे मुलकी काम चालवून ताब्यांत असलेल्या किल्यांची देखरेख व इतर किरकोळ कामें, यांचा बंदोवस्त खुद्द बाळोबाबाबा हे ठेवीत होते. श्रीमंतांकडील वकीलीचें काम काशीपंत बाबा जोगळेकर यांजकडे होतें. या शेवटच्या उभयतां गृहस्थावर कितीएक कारणास्तव श्रीमंतांची मोठी कृपा झाली; व पुढें कांहीं दिवसांनीं बाळोबाबाबा हे तर श्रीमंतांचे कारभारी मंडळांत प्रमुख होऊन त्यांचे दरबारांतील सर्व मसलती व इंग्रजांबरोबर बोलणें चालणें त्यांचे मार्फत चालूं लागलें. तेव्हां पेशव्यांनी त्यांस स्वतंत्र तैनात करून दिली, व पालखी देऊन तिजबइल नेमणूकही पृथक करून दिली.

कांहीं दिवसांनीं विठ्ठलराव हे युद्धादीकलांत प्रविण झाले. या समयीं विठ्ठलराव व आबा साहेब पुरंदरे यांचें वय समान असून उभयतांचे आभ्यास सारख्याच प्रकारचे चालले असल्यामुळें त्या परस्परांची अत्यंत प्रीति जडली. उभयतांनीं दररोज मैदानांत जाण्याचा पाठ ठेवून घोडे फेरणें, बोथाट्या खेळणें व बंदुकीनें निशाण मारणें, हे आभ्यास पूर्ण घटविले. तेव्हां पुढें पुढें तर त्या दोघांचें प्रेम इतकें वृद्धिंगत झालें कीं, उभयतांची भेट झाल्याखेरीज एक दिवसही लोटत नसे. असा क्रम चालला असतां, ते उभयतां शिपाईगिरीचे विद्येंत चांगले प्रवीण झाल्याविषयीं चोहों-

कडे प्रसिद्धी झाली. त्यावरून त्यांची हुषारी कित्पत् आहे ती समक्ष पाहावी अशी बापू गोखले यांस इच्छा झाली. तेव्हां एके-दिवशीं ते दोघे मैदानांत घोडे फेरण्यास गेल्याची बातमी ठेवून बापूसाहेब स्वतः त्या ठिकाणीं गेले; आणि त्यांची कर्तबदारी पाहून त्यांस मोठें आश्चर्य वाटलें. नंतर ते विठ्ठलराव यांजबरोबर स्वतः बोथाटी खेळण्यास प्रवृत्तझाले, तेव्हां विठ्ठलराव हे आपले वस्ताद सोळसकर यांनीं उत्तम प्रकारें तयार केलेले मार्तंड नांवाचे घोड्यावर बसून त्यांजबरोबर बोथाटी खेळूं लागले; परंतु गोखलें यांचें शरीर वायूचें असल्यामुळें अवजड होतें व विठ्ठलराव यांचे शरीर कसरतीनें कसलेलें असून त्यांचे तारुण्याची केवळ सुरुवातच होती; तशांत त्यांचा घोड्यावर बसणें वगैरेचा अभ्यासही नवाच तरतरीत होता; ह्यामुळें बोथाटी खेळण्याचे डावपेचांत गोखल्यांची बोथाटी चुकून त्यांजवर विठ्ठलराव यांची पांचसात वेळा सरशी झाली. तेणेंकरून बापू गोखले हे मनांत खजील झाले. इतक्यांत संध्याकाळ झाला, सबब त्रिवर्ग सरदार आपापले घरीं गेले. बोथाटी खेळण्यांत आपले पदरीं कमीपणा आला याचें कारण काय असावें म्हणून बापू गोखले हे रात्रीं आपले मनांत विचार करूं लागले. तेव्हां पुष्कळ वेळ तें त्यांच्या लक्षांत येईना; परंतु शेवटीं ज्या घोड्यावर विठ्ठलराव बसले होते तो घोडा फारच चपळ असल्यामुळें तशी गोष्ट झाली असें त्यांस खास वाटलें. त्यावरून तो घोडा कसा तरी विठ्ठलराव यांजपासून घ्यावा असा त्यांनीं इरादा केला. नंतर ती गोष्ट त्यांनीं कारभारी बाळोबा बाबा यांजपाशी काढिली. त्यांनीं ती तात्काळ कबूल करून घरीं परत आल्यावर आपले मालिक विठ्ठलराव यांस तो घोडा गोखले यांस देण्याविषयीं विनंति केली; परंतु विठ्ठलराव यांनीं ती विनंति अगदीं अमान्य करून, मी आपला घोडा कधींही देणार नाहीं, असें त्यांस स्पष्ट सांगितलें. तेव्हां बाळोबाबाबा हे फारच लाचार झाले. तथापि ज्यापेक्षां गोखल्यावर श्रीमंतांचा

लोभ आहे, त्यापेक्षां त्यांस घोडा देणें हेंच प्रशस्त असून तो न देण्याचा आग्रह धरिला तर परिणाम चांगला होणार नाहीं, असें त्यांस वाटून त्यांनीं ती गोष्ट काशीपंत बाबा यांजवळ काढिली. तेव्हां ते बोलले कीं, "आपले मालिकांचे मर्जीतील घोडा त्यांजकडून आम्हानें दुसऱ्यास देवविणें हें आपणास उचित नाहीं. गोखल्यांस पाहिजे तर त्याचे ऐवजीं दुसरे दाहा घोडे द्यावे" परंतु बाळोबा यांचें वचन गुंतलें होतें सबब ते मोठे विचारांत पडले. शेवटीं त्यांनीं विलक्षण हिय्या केला आणि तो घोडा विठ्ठलराव यांचे नकळत पागेंतून सोडून परभारें गोखले यांजकडे पाठवून दिला. या गोष्टीची खबर विठ्ठलराव यांस लागतांच त्यांची मर्जी अतिशय बेताल होऊन गेली; परंतु काशीपंत बाबानीं मोठे प्रयासानें त्यांची समजूत घालून त्यांचा राग शांत केला.

या संधीस फौजेवरील अधिकारी बाबूराव नाना हे परलोकवासी झाले. सबब विठ्ठलराव यांनीं त्यांचे चिरंजीव बापाजी बाबूराव यांस त्यांचे वडिलांचे सरदारीवर कायम केलें; परंतु पुढें तेही अकस्मात मृत्यु पावले. त्यांस औरस पुत्रसंतति नसल्यामुळें विठ्ठलराव यांनीं त्याचे भावाबंदांपैकीं एक मुलगा त्यांचे स्त्रीस दत्तक देऊन त्याचें नांव आबूराव असें ठेविलें. हें नांव त्यांचे वंशाचे मूळ पुरुषास होतें. तो दत्तक अल्पवयस्क असल्यामुळें त्याचें काम चालविण्यास विठ्ठलराव यांनीं बाळाजी भगवंत म्हणून आपले पदरचा एक हुषार मनुष्य नेमिला.

सन १८०७ इ० सालीं नर्मदा नदीचे दक्षिणेकडील प्रदेशांत झालेले दंगे व पेंढारी लोकांच्या लुटालुटी यांचा बराच बंदोबस्त झाला असें आह्मीं पूर्वी नरसिंह खंडेराव यांचे चरित्रांत लिहिलें आहे. तथापि तो उपद्रव अजी नाहींसा झाला होता असें नाहीं. तशांत या वेळेस यशवंतराव होळकर यांचे फौजेंतून कित्येक नामांकित शूर सरदार निघून जाऊं लागले होते, व असे जे कोणी निघून जात ते हात्यारबंद लोक जमवून बंडें करीत. त्यामुळें पूर्वी-

प्रमाणें सर्वत्र अस्वस्थाता होऊन मुलूक उजाड होऊं लागला. हीं सर्व बंडें मोडून पेंढाऱ्यांचा विध्वंस करण्यास्तव आणि भिल्ल, कोळी, रामोशी वगैरे जातींचे लुटारु लोकांस चांगलें शासन करून ते पुढें सात्वीकपणाचे धंदे करून निर्वाह करितील व त्या प्रांतांतून पुनः कधींही दंगे होणार नाहींत असा पक्का बंदोबस्त करण्यास्तव बाजीरावसाहेब पेशवे व पुण्याचे रेसिडेन्ट यांमध्यें पत्रव्यवहार सुरू झाला. त्याचे अंतीं सदहू बंदोबस्त अवश्य करावा असें ठरल्यावरून, इंग्रज सरकारानें कर्नल वालेस साहेब यांस फौजेच्या एका टोळीनिशीं त्या मोहिमेवर पाठविलें; व पेशव्यांनीं आपलै तर्फेनें विठ्ठलराव यांची योजना करून त्यांस आपली कायमची सर्व फौज व शिवाय इतलाक * फौज बरोबर घेऊन कर्नल वालेस साहेबास जाऊन मिळण्याविषयीं हुकुम केला. बाळोबा बाबा व काशीपंत बाबा हे आपले मालिकांची व्यवस्था लावून देण्याकरितां कांहीं दिवस पुण्यास राहिले. बाळोबा बाबानीं आपले चुलत बंधु कृष्णाजी शामराव यांस स्वारींतील कारभारी नेमिलें; व वरलिहिल्याप्रमाणें सर्व व्यवस्था लागल्यावर विठ्ठलराव हे सदहू मोहिमेवर चालते झाले.

उभयतां सेनापतींनीं आपापलें लष्करानिशीं घोडनदी मुकामीं जाऊन छावण्या केल्या. तेथें त्यांचा असा विचार ठरला कीं, प्रथम खानदेशांत जाऊन तेथील बखेडा मोडावा. त्यावरून ते त्या प्रांतात गेले; आणि त्यांनीं आपल्या फौजेच्या निरनिराळ्या टोळ्या करून त्या पैकीं तीन टोळ्या खानदेशांत ठेविल्या; व एक टोळी बागलाणांत ठेवून दोन सातपुडा पर्वताचे रस्ते बंद करण्यास नेमिल्या. याखेरीज त्यांनीं एक टोळी नाशिकापासून चांदवडपर्यंत बंदोबस्त करण्यास ठेविली. कर्नल वालेस साहेब यांनीं खुद्द सातपुडा पर्वताचे प्रयथ्याशीं माळव्याचा रस्ता रोखून तळ दिला; व वि-

---

* प्रसंगोपात नवीन भरती केलेली.

ठ्ठलराव हे आपले हाताखालचे टोळीसुद्धां धूळ्यास राहिले. याप्रमाणें चोहोंकडे बंदोबस्त केल्यामुळें प्रजेस पेंढाऱ्यांचा उपसर्ग लागेनासा झाला; परंतु थोडेच दिवसांनीं होळकरांचे नौकरींतून निघालेला दादेखान नांवाचा एक बंगष पठाण हा कांहीं फौजेनिशीं नेमाड प्रांतांतून निघाला आणि जो रस्ता कर्नल वालेस साहेब हे रोखून राहिले होते तो रस्ता सोडून देऊन, दुसऱ्या मार्गानें खानदेशांत येऊन दाखल झाला. ही खबर विठ्ठलराव यांस धुळें मुक्कामीं समजतांच त्यांनीं फौजेसुद्धां कूच करून राणीपुरा येथें दादेखान याजवर हल्ला केला; व त्याचा अगदीं मोड करून त्याचे फौजेची वाताहात केली; आणि त्यास कैद करून पुण्यास पाठवून दिलें. याप्रमाणें चोहोंकडे बदमाष लोकांस दहषद बसून बंदोबस्त राहिल्यानें, रस्ते सुरळीत चालूं लागले; शेतकरी लोक जमिनीची उस्तवारी करूं लागले; व एकंदरीनें सर्व रयत सुखानें नांदूं लागली. नंतर विठ्ठलराव यांस कांहीं दिवस खानदेशांत राहण्यास सांगून, कर्नल वालेस साहेब हे घोडनदीस निघून गेले. तेथून त्यांनीं पुणें येथील रेसिडेंटास आपले स्वारीसंबंधी एकंदर रिपोर्ट केला. त्यांत त्यांनीं विठ्ठलराव यांची फारच तारीफ केली होती. हा मजकूर रेसिडेंट यांनीं पेशवे यांस कळविल्यावरून त्यांनीं त्याबद्दल विठ्ठलराव यांस शाबासकीचें पत्र पाठविलें.

पुढें थोडकेच दिवसानीं शूर्पकर्ण नांवाच्या एका मनुष्यानें बंड माजविलें. तो जरी वाणी जातीचा होता तरी मोठा साहसकर्मी होता. त्यानें खानदेशाच्या उत्तर भागांत तापी नदीचे आसपास आरब, रोहिले वगैरे कडवे लोक एकत्र करून धामधूम मांडिली. तो मुलूक लुटीत असून शिवाय खून करणें, घरें जाळणें, वगैरे अनेक तऱ्हेचे अनर्थ करीत असे. हें वर्तमान विठ्ठलराव यांस कळतांच त्यांनीं त्याजवर छापा घालून त्याचे लोकांची अगदीं दाणादाण करून टाकिली; आणि त्यासही एके ठिकाणीं गांठून त्याचें शिर उडविलें. याप्रमाणें या बंडाचा शेवट झाला.

वर लिहिल्याप्रमाणें झपाटचानें बंदोबस्त होत गेल्यामुळें खानदेश, बागलाण व गंगथडी या प्रांतांत मोघलाईचे सरहद्दीपर्यंत तर स्वस्थता झालीच; परंतु या सुमारास उत्तर हिंदुस्थानांतील राजेरजवाडे यांजबरोबर इंग्रज लोकांनीं तह केल्यामुळें लढाईचें कारण नाहींसें होऊन पुष्कळ शिपाई लोक रिकामे झाले. ते टोळ्या जमवून दक्षिणेंत लुटालूट करण्यास येऊं लागले. त्यामुळें खानदेशांत पुनः उपद्रव होऊं लागला. सबब पेशवे व पुण्याचे रेसिडेंट यांनीं पुनः विचार करून असें ठरविलें कीं, जनरल स्मिथ साहेब व विठ्ठलराव विंचूरकर यांस त्या लुटारू लोकांचे बंदोबस्ताकरितां नेमावें. विठ्ठलराव हे त्या वेळेस खानदेशांतच होते. त्यांस जनरल स्मिथ साहेब यांस झटून मदत करण्याविषयीं श्रीमंतांकडून हुकूम गेला. त्यावरून विठ्ठलराव हे घोडनदीस जाऊन जनरल स्मिथ साहेबांस भेटले. त्या भेटींत उभयतांचे बोलणें होऊन त्यांत असें ठरलें कीं, सातपुड्यांतील सर्व डोंगरांच्या वाटांवर जागोजाग फौजा ठेऊन प्रथम पलीकडील पेंढारी लोक आलीकडे न येतील असा बंदोबस्त करावा; आणि मग जे लुटारू लोक पूर्वींच दक्षिणेंत आले असतील त्यांवर हल्ले करून त्यांचा अगदीं निःपात करून टाकावा. त्याबरहुकूम उभय सरदारांनीं फौजेच्या टोळ्या ठिकठिकाणीं ठेऊन सर्व रस्ते बंद केल्यावर दक्षिणेंत शिरलेल्या लुटारू लोकांवर फौजा पाठवून एकदम हल्ले केले. त्या हल्ल्यांत ते बहुतेक बंडवाले मारले गेले आणि जे शिलक राहिले ते लुटीचा धंधा अगदीं सोडून देऊन स्वस्वस्थतेनें आपापल्या गांवीं शेतकीचीं कामें करूं लागले. याप्रमाणें सर्वत्र शांतता झाल्यावर स्मिथसाहेब हे घोडनदी येथील छावणीस परत गेले. तेथून त्यांनीं पुण्याचे रेसिडेंटांस सदहू बंड.संबंधीं रिपोर्ट केला. त्यांत विठ्ठलराव यांनीं व त्यांचे फौजेनें चांगली मदत केली म्हणून लिहिलें होतें. हा मजकूर रेसिडेंटांनीं पेश-

ब्यांचे दरबारास लिहून पाठविला. त्यावरून पेशव्यांनीं विठ्ठलराव यांची मोठीच वाहवा केली.

बाजीरावसाहेब पेशवे यांजवळ त्रिंबकजी डेंगळे या नांवाचा एक हुजऱ्या होता. त्याजवर त्यांची मोठी मर्जी बसून त्यांनीं त्यास मोठ्या योग्यतेस चढविलें होतें. तो कांहीं राजकीय कारणास्तव इंग्रज लोकांचे कैदेंत असतां, तेथून युक्तीनें पळून गेला; आणि त्यानें भिल्ल, कोळी, रामोशी, आरब, रोहिले वगैरे लोक जमा करून मोठें बंड माजविलें. तें बंड मोडण्याविषयीं पुण्याचे रेसिडेंटांनीं पेशव्यांस सक्तीची सूचना केल्यावरून त्यांनीं विठ्ठलराव यांस हुकूम केला कीं, "मोठा यत्न करून डेंगळ्याचें बंड अगदीं मोडून टाकावें; आणि त्याचे वतनाचे गांवीं खुद्द त्याचा वाडा व असबाब आहे तो सर्व जप्त करावा." त्या हुकुमा बरहुकूम विठ्ठलराव यांनीं डेंगळ्याच्या फौजेचा शोध ठेविला आणि त्या लोकांवर दोन वेळा हल्ला करून त्यांस पळवून लाविलें; तत्रापि बंड अजी नाहींसें झालें नाहीं. सबब विठ्ठलराव यांनीं गुप्त बातमी ठेवून रात्रीचे वेळेस त्या बंडवाल्यावर छापा घातला. त्या छाप्यांत बहुतेक बंडवाले मारले जाऊन कितीएक घोडे व इतर सामान विठ्ठलराव यांचे फौजेचे हातीं लागलें. फक्त त्रिंबकजी मात्र पळून गेला. नंतर विठ्ठलराव यांनीं नगर जिल्ह्यांत जाळीचें निंबगांव येथें त्यांचें जें वतन होतें तें व त्याचा तेथील वाडा आणि आंतील दरोबस्त सामान असें जप्त केलें आणि ती हकीकत पेशवे यांजकडे लिहून पाठविली. तेव्हां श्रीमंतांनीं विठ्ठलराव यांजकडून आलेलें अस्सल पत्र आपले पत्रासोबत रेसिडेंटांकडे पाठवून दिलें. त्यावरून रेसिडेंट फार खूष होऊन त्यांनीं विठ्ठलराव यांचे वकील काशीपंत बाबा यांस बोलावून सांगितलें कीं, "विठ्ठलराव यांनीं डेंगळ्याचें बंड मोडण्यांत सरकारची चाकरी उत्तमप्रकारें बजाविली; व इंग्रज हुद्देदारांबरोबर इतर कामांत त्यांनीं बहुत चांगलें वर्तन केलें, येणेंकरून आम्हांस मोठी खुषी झाली असून हा

मजकूर आम्ही गव्हरनर जनरल यांस लिहून कळवूं. ही हकीकत तुम्हीं आपले मालिकांस कळवावी."

त्यानंतर विठ्ठलराव यांनीं, जे भिल्ल लोक गंगथथडींत वारंवार दंगा व लुटालुट करीत असत त्यांचे नायकांस अभयवचनें देऊन भेटींस बोलाविलें, आणि जे हाजिर झाले त्यांचे वाजवी हक्क होते ते कबूल करून त्यांचा बंदोबस्त केला. त्या लोकांचे ते हक्क अद्यापि इंग्रज सरकाराकडून चालत आहेत. बाकीचे जे कित्येकजण भेटींस न येतां पूर्ववत् लुटालूट करूं लागले, त्यांजवर त्यांनीं वारंवार हल्ले करून त्यांचा अगदीं नाश केला. याप्रमाणें सर्व गंगथडीत स्वस्थता करून विठ्ठलराव पुण्यास गेले. तेथें त्यांनीं श्रीमंतांचीं भेट घेऊन त्यांस स्वारींतील सर्व मजकूर निवेदन केला. तेव्हां श्रीमंतांनीं बहुत संतोष दर्शविला; आणि त्यांचें दत्तविधान होण्यापूर्वी त्यांचे कारभाऱ्यांपासून नजराण्याबद्दल जी तीन लाख रुपयांची चिठ्ठी लिहून घेतली होती, ती बक्षिस ह्मणून त्यांस परत दिली.

विठ्ठलराव यांचे वडील नरसिंह खंडेराव विंचुरकर यांचे कारकीर्दीत त्यांचे घराण्यांचे उत्तर हिंदुस्थानांतील कांहीं माहाल शिंदे यांचे लष्करी सरदार अंबाजी इंगळे, जानबाप्टिस्ट दतियावाले राजे, आणि इतर ठाकूर संस्थानिक यांनीं बळकाविले होते. ते परत घेण्याकरितां स्वतः उत्तर हिंदुस्थानांत जाण्यासाठीं नरसिंहराव यांनीं पेशव्यांची परवानगी मागितली असून ती त्यांस मिळाली होती; परंतु पुढें त्यांस एकाएकीं देवाज्ञा झाल्याकारणानें त्यांचें जाणें त्या प्रांती न होऊन ते माहाल त्या लोकांकडे तसेच राहिले. ते परत घ्यावे ह्मणून विठ्ठलराव यानीं आपले दिवाण बाळोबाबाबा यांचें मार्फत ग्वाल्हेर येथील रेसिडेंट कर्नेल क्लोज व इतर इंग्रज हुद्देदार यांस दौलतराव शिंदे यांजपाशीं मध्यस्थी करण्याविषयीं विनंति केली. ती विनंति कर्नेल साहेब यांनीं मान्य करून त्या बाबदींत शिंदे यास पत्र लि-

हिलें कीं, "कांहीं वर्षांपूर्वी आपले कित्येक कामगार व बुंदेल खंडातील संस्थानिक यांनीं विंचुरकर यांचे उत्तर हिंदुस्थानांतील माहाल बळकाविले असून आजवर ते त्यांचा वसूल घेत आहेत हें नीट नाहीं; याकरितां ते माहाल विंचुरकर यांस तावडतोब परत देववावे; नाहीं तर इंग्रज सरकारास त्या बाबतींत सक्तीची तजवीज करणें जरूर होईल." शिंदे यांनीं ती गोष्ट तात्काळ कबूल करून आपल्या ज्या कामगारांनीं विंचुरकर यांचे माहाल बळकाविले होते त्या कामगारांकडून पूर्वी वसूल केलेल्या एकंदर ऐवजासुद्धां ते विठ्ठलराव यांचे तर्फेचे वहिवाटदारांस परत देवविले; आणि त्या खेरीज दत्तियावाले राजे व इतर सस्थानिक यांनीं जी त्यांची ठिकाणें बळकाविलीं होतीं तींही त्यांजकडून सदर्हू वहिवाटदार यांचे स्वाधीन करविलीं.

कर्नल वालेस व स्मिथ साहेब यांनीं खानदेशचे उत्तर भागांत पेंढारी लोकांवर वारंवार स्वाऱ्या करून त्या लोकांचे दंगे मोडले होते; परंतु ते लोक आपले माळव्याचे जंगलांतील मुख्य ठिकाणांतून वेळेवेळ बाहेर पडून वऱ्हाड प्रांत व दक्षिणेचा उत्तर भाग यांवर लुटीकरितां स्वाऱ्या करीत. तेणेंकरून पूर्वी खानदेशांत झालेली स्वस्थता व्यर्थ झाल्यासारखें होऊन त्यांनीं वऱ्हाडांत मोठा प्रळय चालविला होता. त्या वेळेस त्यांची एकंदर संख्या सुमारें पन्नास हजार झाली होती. त्यांस आंतून कित्येक राजेरजवाडे यांची मदत असून त्या राजे लोकांकडील बरतर्फ झालेल्या ज्या नोकरांस वतनें किंवा स्थावर मिळकती नव्हत्या ते लोक सदर्हू पेंढारी लोकांत मिळत होते. अशा प्रकारें पेंढारी लोक प्रबळ होत चालल्यामुळें ते पुढें अनिवार्य होण्याची इंग्रज लोकांस भीति प्राप्त झाली. तेव्हां पेंढारी लोकांच्या राहाण्याच्या मुख्य ठिकाणावर चोंहींकडून एकदम हल्ले करून त्यांचें निर्मूळ करावें असा त्यांनीं ठराव केला. ही गोष्ट मोठ्या शाहाणपणाची असून इंग्रज लोकांच्या राज्याचा पाया मजबूत हो-

ण्यास कारणीभूत झाली. वर लिहिलेला ठराव अमलांत आणण्यास्तव गव्हरनर जनरल यांचे हुकुमावरून बंगाल्यामध्यें ४४००० व दक्षिणेंत ७०००० इतकी फौज तयार झाली. दक्षिणेंतील फौजेवर सरदार होते ते येणेंप्रमाणें.—पहिले तुकडीवर सर टामस हिस्लाप, दुसरे तुकडीवर ब्रिगेडियर जनरल डोवटन, तिसरे तुकडीवर सर जान मालकम व चवथे तुकडीवर ब्रिगेडियर जनरल स्मिथ.

जनरल स्मिथ यांची योजना खानदेशचे उत्तर भागांतील पेंढाऱ्यांवर झाली होती. त्यांचे मदतीस पूर्ववत विठलराव विंचूरकर यांस देण्याविषयीं पुणें येथील रेसिडेंट एलफिन्स्टन साहेब यांनीं वकीलमार्फत पेशव्यांचे दरबारास पांच कलमांची यादी पाठविली. त्यांपैकीं पहिली चार कलमें, विठलराव यांचे हाताखालचे फौजेचे व्यवस्थेबद्दल असून, शेवटचे कलमांत खालीं लिहिल्याप्रमाणें मजकूर होता.

" विंचूरकर यांनीं सर्व प्रकारें इंग्रज सरकारचे सरदारांचे हुकमतींत वागावें. इंग्रज सरकारचे हुद्देदार विंचुरकर यांचे वर्तनाविषयीं सिफारिष अगर गिल्ला करतील त्यावर त्यांची सरदारी अवलंबून राहील असें त्यांनीं पक्कें समजावें.

" या सर्व कलमांतील मजकूर श्रीमंतांनीं विंचुरकर यांस स्वमुखें सांगून जनरल स्मिथ यांचे लष्करात सत्वर जाऊन मिळण्याविषयीं त्यांस हुकूम द्यावा."

सदर्हू मजकूर पेशव्यांनीं विठ्ठलराव यांस कळवून स्मिथ साहेबांचे छावणीस जाण्याविषयीं त्यांस हुकूम केला.

या मोहिमेकरितां विठ्ठलराव यांजकडे नवीन इतलाक फौज दिलेली होती. तिचे खर्चास वारंवार अडचण पडूं लागली. सबब गंगथडी, खानदेश व बागलाण या प्रांतांचे सरसुभे बाळोबाबाबा, ह्मणजे विंचूरकरांचे कारभारी, यांस पेशव्यांकडून असा हुकूम गेला कीं, सदर्हू प्रांतांचें दरोबस्त उत्पन्न विठ्ठलराव यांचे

इतलाक फौजेचे खर्चास देत जावें. ही व्यवस्था विठ्ठलराव कूच करून जाण्यापूर्वींच करण्यांत आली होती.

वरील कलमात असें लिहिलें आहे कीं, बाळोबाबाबा हे विंचुरकरांचे कारभारी असून पेशव्यांकडील गंगथडी, खानदेश व बागलाण या प्रांतांचे सरसुभेही होते. या गोष्टीच्या संबंधानें वाचकांस घोटाळा न पडावा ह्मणून येथें त्याबद्दल जरा अधिक खुलासा करणें अवश्य आहे. सदर्हू बाळोबाबाबा सालकाढे हे विंचुरकर घराण्याचे पिढीजादे दिवाण असून मोठे हुशार मुत्सद्दी होते. बाजीराव साहेब यांचे कारकीर्दीचे आरंभापासून पेशव्यांचे दरबारांत त्यांचा पुष्कळ काळ गेला असून ते कितीएक प्रसंगीं श्रीमंतांचे फार उपयोगीं पडले होते. सबब त्यांची चोहीकडून प्रसिद्धी होऊन त्यांजवर बाजीराव साहेब यांचा मोठा लोभ बसला. तेव्हां श्रीमंतांनीं सन १८०५ इ० सालीं खानदेश, बागलाण व गंगथडी यांजवर त्यांस सरसुभे नेमिलें, व त्या प्रांतांतील भिल्ल, कोळी, रामोशी, कैकाडी, मांग वगैरे हलक्या जातीचे दंगेखोर लोकांचा बंदोबस्त करण्याचें काम त्यांजकडे सांगून त्यांचे मदतीस मनोहरगीर गोसावी यांस आपले हाताखालचे पांच साहा हजार फौजेनिशी दिले. सदर्हू दंगे मोडण्यासाठीं बाळोबाबाबा यांनीं अनेक तऱ्हेचे उपाय करून पाहिले, परंतु कांहींच चालेना, कारण, त्यां लोकांवर फौजेची जरा सक्ती झाली ह्मणजे तेव्हढ्या वेळेपुरता दंगा बंद करून ते स्वस्थ बसत; परंतु पेंढारी लोकांनीं माळव्यांतून येऊन दंगा माजविला, म्हणजे ते पुनः लागलीच उठावणी करून लुटण्याचा व दुसरीं अनेक अनुचित कर्में करण्याचा क्रम सुरू करीत. सन १८१५, १६आणि १७ इ. या सालीं जेव्हां पेंढारी लोकांच्या टोळ्यांच्या टोळ्या माळव्यांतून येऊन खानदेश वगैरे प्रांतांत लुटालूट करूं लागल्या, त्या वेळेस वरील लोकांनी पुनः दंगा करून सरकारचे रयतेस नाना प्रकारें उपद्रव दिला. कोणी लग्नकार्याकरितां परगांवीं खटल्या-

सुद्धां जाऊं लागले ह्मणजे त्यांजवर त्या लोकांनीं हल्ले करून त्यांस लुटावें; त्यांच्या बायका धरून नेऊन बाटवाव्या; व त्यांचीं मुलेंबाळें हाती लागतील तीं धरून नेऊन गुलाम करावीं. तसेंच त्या लोकांच्या टोळ्यांनीं गांवोगांव हल्ले करून लुटालूट करावी, आणि गांवांतील सर्व जातीच्या सुस्वरूप बायका धरून न्याव्या. असा हा झोटिंगबादशाहीचा सपाटा चालला असतां, त्याची हकीकत विठ्ठलराव यांस वर लिहिलेले मोहिमेवर जाण्याचे वेळेस विशेष रीतीनें कळून आली. सबब त्यांनीं पेशवे यांस विनंति करून बाळोबाबाबा यांस पुण्यास ठेवण्याची तजवीज केली; व त्यांचे सरसुभ्याचे हुद्यावर त्यांचे चुलतबंधु कृष्णाजी शामराव यांस पाठविलें; आणि वर लिहिलेल्या दंगेखोर लोकांचा बंदोबस्त करण्याकरितां आपले फौजेवरील अधिकारी कोठमगांवकर यांचे कुलमुखत्यार बाळाजी भगवंत यांस नेमिलें. ह्या कामगारानें त्या दंगेखोरांस पुष्कळ रीतींनीं जरबेंत ठेवण्याचा यत्न केला; परंतु तो सर्व व्यर्थ झाला. शेवटीं त्या लोकांची कोणत्या तरी रीतीनें समजूत करण्यास्तव बाळाजी भगवंत यांनीं त्यांचे नायकांस बोलावणीं केलीं. त्यांपैकीं जे कांहीं लोक हाजिर झाले त्यांस त्यांनीं खुष करून वाटेस लाविलें; परंतु ज्यांनीं मोठाले गुन्हे केले होते ते व इतरही कित्येक हाजिर झाले नव्हते त्यांजवर त्यांनीं हल्ले केले आणि जे सांपडले त्यांस कैद करून त्यांपैकीं ज्यांनीं ज्यांनीं गांवें जाळिलीं होतीं व ब्राह्मणांच्या बायका जबरीनें बाटवून घरांत घातल्या होत्या, त्यांस देहांतशिक्षा दिल्या; व बाकीच्या लाहानसाहान गुन्हेगारांनीं पुढें चांगले प्रकारें वागण्याचें कबूल केल्यावरून त्यांस सोडून दिलें.

सन १८१७ इ. सालाचे आरंभीं बाजीराव साहेब व इंग्रज सरकार यांजमध्यें एक नवीन तह झाला. त्यांत बाजीराव साहेब यांनीं नर्मदा नदीचे उत्तरेकडील मुलकावरील आमला वर्चस्वाचा हक्क इंग्रज सरकारचे स्वाधीन केला. त्यामुळें त्या प्रांतांतील आपले मुल-

काचे बाबतींत विठ्ठलराव हे अर्थातच इंग्रज सरकारचे ताबेदार झाले. परंतु पुण्याचे रेसिडेंट यांनीं त्यांचे दिवाण बाळोबाबाबा यांस असें सांगितलें कीं, "तुमचे मालीकांचा नर्मदा नदीचे उत्तरेकडील जो मुलूक आमचे ताब्यांत आला आहे, त्याचे मोबदला दक्षिणेंत दुसरा मुलूक मिळण्यास्तव त्यांनीं पेशवे सरकारास विनंति करावी." परंतु बाळोबाबाबा यांनीं तसें करणें नापसंद करून, "माझे मालिकांचे उत्तर हिंदुस्थानांतील मुलूक इंग्रज सरकारानें आपले तर्फेची जाहागीर ह्मणून त्यांजकडे चालवावे," अशी साहेब मौसूफ यांस विनंति केली. हा मजकूर एलाफिन्स्तन साहेब यांनीं गव्हरनर जनरल यांस कळविल्यावरून त्यांनीं बाळोबाबाबा यांचें म्हणणें मान्य करून एलफिन्स्टन साहेब व कर्नल क्लोज म्हणजे ग्वाल्हेर येथील रेजिडेंट यांस असें लिहिलें कीं, "इंग्रज सरकारास गरज लागेल त्यावेळेस लढाईस उत्तमप्रकारें उपयोगीं पडतील असे आठशें स्वार इंग्रज सरकारचे मदतीस देण्याची शर्त विंचूरकर कबूल करितील तर त्यांस आपले उत्तर हिंदुस्थानांतील मुलकाचा पूर्ववत् उपभोग करण्याची परवानगी देऊन तशा अधिकाराची सनद ही त्यांस करून द्यावी." हा हुकूम अमलांत यावयाचा; परंतु पुढें लवकरच पेशवे व इंग्रज यांमध्यें लढाई उपस्थित झाली, त्यामुळें तें सर्व तसेंच राहून गेलें.

विठ्ठलराव हे जनरल स्मिथ यांजबरोबर पेंढाऱ्यांचा बंदोबस्त करण्याचे मोहिमेवर असतां त्यांस फौजेसुद्धां पुण्यास तावडतोब येण्याविषयीं बाजीराव साहेब यांचा हुकूम गेल्यावरून त्यांनीं आपलें फौजेपैकीं पंधराशें स्वारांची टोळी खानदेश वगैरे मुलूकांचे सरसुभे, (आपले दिवाणाचे चुलतबंधु कृष्णाजी शामराव), यांचे हाताखालीं जनरल स्मिथ यांचे मदतीस ठेवून बाकीचे फौजेनिशीं पुण्याकडे कूच केला.

पुढें पेशवे व इंग्रज यांजमध्यें लढाई सुरू झाल्यावर जनरल स्मिथ यांनीं कृष्णाजी शामराव यांस ती खबर कळवून

आपले छावणींतून निघून जाण्यास सांगितलें; परंतु त्यांनीं जनरल स्मिथ यांस असा जबाब दिला कीं, "मला तुमच्याबरोबर राहण्याविषयीं माझे मालिकाचा हुकूम आहे, असें असतां, मी तुम्हांस सोडून गेलों तर, तो हुकूम तोडल्याचे दोषास पात्र होईन." तेव्हां जनरल यांनीं त्यांस असें कळविलें कीं, "पेशवे व इंग्रज सरकार यांमध्यें लढाई सुरू झाली आहे, यामुळें तुम्हांकडे तो दोष येणार नाहीं; याकरितां तुह्मी आतांचे आतांच छावणींतून निघून जावें; नाहीं तर मी तुह्मांस शत्रुप्रमाणें मानून त्याबरहुकूम वर्तन करीन." याप्रमाणें स्मिथ साहेबांनीं सक्त ताकीद दिल्यावरून कृष्णाजी शामराव हे निरुपाय होऊन त्यांचे छावणींतून विठ्ठलराव यांजकडे गेले.

हिकडे विठ्ठलराव पुण्यास आल्यावर त्यांस असें दिसून आलें कीं, पेशव्यांची राजसत्ता अगदीं क्षीणतेस पावली असून सर्व लोक नाउमेद झालेले आहेत. तसेंच दरबारांतील मुत्सद्दी मंडळी देखील, होणार तें चुकत नाहीं, असें समजून दिलगीर बसली आहे. हा सर्व प्रकार पाहून विठ्ठलराव यांचें मन फारच उदास झालें. बाळोबाबाबा कारभारी यांनीं त्यांस अशी खबर कळविली कीं, "श्रीमंतांबरोबर माझें बोलणें झालें त्यांत त्यांनीं मला असें सांगितलें कीं, 'मी इंग्रजांस अत्यंत प्रामाणिक समजून सर्व प्रकारें त्यांजवर भरंवसा ठेविला होता. पण त्यांनीं मला वेळोवेळ अडचणींत आणून प्रत्येक वेळेस नवे नवे तह करून घेतले आणि माझी सर्व राजसत्ता हरण करून मला तृणवत् केलें आहे. अशा स्थितींत आपलें स्वातंत्र्य कायम ठेवण्यास निर्वाणीचा उपाय म्हटला तर त्या लोकांबरोबर लढाई करून जय मिळविणें एवढाच काय तो राहिला आहे, तो करुन पाहावा. मग त्यांत प्रारब्धानें जें होणार असेल तें होईल. हा शेवटचा उपाय करून पाहाण्याविषयीं माझा व बापू गोखले यांचा निश्चय ठरून मीं त्यांचे मार्फत लढाईची तयारी चालविली आहे; आणि तु-

म्हास (विठ्ठलराव यांस) तरी याजकरितांच हुजूर बोलाविलें आहे." ही खबर ऐकून विठ्ठलराव यांस अतिशय वाईट वाटलें; आणि त्यांनीं बाळोबाबाबांस सांगितलें कीं, "मी कांहीं दिवस इंग्रज लोकांबरोबर लढाईंत असल्याकारणानें मला इंग्रज सरकारचे सामर्थ्याची पूर्ण माहिती झाली आहे; व त्यावरून मी खचीत सांगतों कीं, सांप्रत इंग्रजांबरोबर लढाई करण्यासारखी आपले मालिकांचे फौजेची स्थिति मुळींच नाहीं. याकरितां तुह्मी त्यांस चार गोष्टी सांगून इंग्रजांबरोबर सख्य राहील अशीच तजवीज करावी." त्यावरहुकूम बाळोबाबाबा व इतर शाहाणे व दूरदर्शी मुत्सद्दी यांनीं पेशवे यांस लढाईचा घाट मोडण्याविषयीं विनंति केली;* परंतु बाजीराव साहेबांनीं त्यांस उत्तर दिलें कीं, "हा मजकूर बापू गोखले यांस कळवावा." त्यावरून पुष्कळांनीं बापू गोखले यांस भेटून, "लढाई केली असतां चांगला परिणाम होणार नाहीं," असें त्यांस समजून सांगून इंग्रजांबरोबर तूर्त सख्य करण्याविषयीं आग्रह केला; परंतु गोखले यांनीं त्यांचे बोलण्याचा आदर केला नाहीं. त्यामुळें सर्व निराश होऊन आपापले ठिकाणीं खिन्न बसले. नंतर कांहीं वेळानें पेशव्यांनीं गणपतराव पानशे यांस तोफखान्याची तयारी करण्याविषयीं हुकूम दिला; परंतु त्यांनीं असा जबाब केला कीं, "सरकारांनीं तोफखान्याखुद्धां इंग्रजी कवाइती फौज आपले जवळ ठेविल्यामुळें आजपर्यंत प्रसंगोपात जीं कामें पडलीं तीं त्यांजकडूनच बजाविण्यांत आलीं. खालसा तोफखान्यास मुळींच काम पडत नसल्यामुळें हालीं दारूगोळा वगैरेची तयारी अगदीं नाहीं. आतां नवीन करायाची ठरली तर, श्रीमंतांनीं जी मुद्दत दिली आहे, त्या मुद्दतींत पाहिजे तशी तयारी होणें अशक्य आहे. तथापि मजकडून होईल तितकी तयारी करण्यास मी बिलकूल

---

* या प्रसंगीं गोविंदराव बापू काळे यानीं बाजीराव साहेबांबरोबर जें भाषण केलें तें बापू गोखले यांचे चरित्रांत समग्र दाखल केलेलें आहे.

कसर करणार नाहीं." शिवाय, पटवर्धन सरदारांचे घराण्य बरोबर पूर्वीं दादासाहिब यांनीं, व त्या अलिकडे बाजीरावसाहेब यांनीं द्रोहभावानें वर्तन केलें असल्यामुळें ह्या महत्प्रसंगीं तेही बाजीराव साहेबांबरोबर औदासिन्यानें वागत राहिले; आणि या लढाईचे प्रसंगीं त्यांचे मदतीस त्यांपैकीं कोणीच आले नाहींत असें म्हटलें तरी चालेल. शिंदे, होळकर, गायकवाड, भोंसले वगैरे मोठ-मोठे सरदारांपैकीं प्रत्येकाबरोबर इंग्रज सरकारानें निरनिराळे तह करून, पेशव्यांस मदत न करण्याविषयीं त्यास गुंतवून घेतलें होतें. त्यामुळें त्यांपैकीं कोणीही पुण्यास येण्यास धजले नाहींत. विंचुरकर, आबा पुरंदरे, व रास्ते या त्रिवर्गीस जरी खास वाट-लें होतें कीं, बाजीराव साहेबांनीं इंग्रजांबरोबर लढाईचा जो घाट घातला आहे त्याचा परिणाम चांगला होणार नाहीं, तरीं समया-नरूप आपले मालिकांचे उपयोगीं पडल्यानेंच आपली इमानदारी निष्कलंक राहील असें त्यांचे मनांत येऊन, फौजांनिशीं पुण्यास येण्याविषयीं त्यांस हुकूम पोहोंचतांच ते आपापल्या फौजेनिशीं पुण्यास गेले. या शिवाय पेशव्या जवळ हुजूरात, मानकरी आरब, रोहिले, गोसावी, वगैरे मिळून पुष्कळ पायदळ फौज होती. ही पाय-दळ व घोडेस्वार यांची एकंदर जमलेली फौज सुमारें ७०००० होती. शिवाय तीन चार कवाइतीं पलटणें फोर्ड नांवाच्या इं-ग्रजाच्या हाताखालीं होतीं; परंतु त्या हुद्देदारानें इंग्रजी फौजेबरो-बर लढण्याचें नाकबूल केल्यामुळें त्या पलटणांपासून पेशव्यांचा कांहींच उपयोग न होतां उलटें नुकसान मात्र झालें; कारण, ल-ढाई सुरू झाल्याबरोबर तो इंग्रजी फौजेकडे जाऊन मिळाला. बाकी जी निवळ मराठी फौज राहिली तिची संख्या जरी मोठी होती, तरी इंग्रजांचे कवाइती फौजेबरोबर संग्राम करण्याजोगी तिची तयारी नसून तिजपाशीं युद्धोपयोगी सामान मुळींच नव्हतें असें म्हटलें तरी चालेल. या सर्व गोष्टी बहुतेक मराठे सरदारांचे नजरेसमूर प्रत्यक्ष दिसत असल्यामुळें कोणासही इं-

मज लोकांशीं सामना करण्याचा मनोत्साह नव्हता. तशांत लढाईसंबंधी अगर फौजेचे व्यवस्थेसंबंधी वगैरे एखादी सयुक्तिक गोष्ट श्रीमंतांस कळविण्यास कोणी गेला तर, "काय ह्मणणें असेल तें गोखल्यांस कळवावें" असा बाजीराव साहेब हुकूम करीत; आणि गोखलयांस कोणी अशी गोष्ट सुचविली तर ते त्या सुचविणाराचा धिःकार करीत. यामुळें सर्व लोक नाखुष असून, फक्त इमान सोडूंनये म्हणूनच, वर सांगितलेले सरदार स्वामीकार्यार्थ आपले जीव खर्चीं घालण्यास तयार झाले होते. लढाई करण्यास फक्त बापू गोखले यांचें मात्र बाजीराव साहेबांचे मर्जीप्रमाणें पूर्ण अनुमोदन होतें. त्यांजपाशीं फौज म्हटली तर इतर सरदारांप्रमाणें घोडेस्वारच होते. असो; ही सर्व स्थिति मनांत आणून बाजीराव साहेबांनीं इंग्रजांबरोबर समेट केला असता तर पेशवाई बुडाली नसती; परंतु त्यांनीं दुराग्रहानें बापू गोखले यांस पुढारी करून लढाईस आरंभ केला. तेणेंकरून सर्व हिंदु लोकांचें स्वातंत्र्य नष्ट होण्यास आरंभ झाला असें म्हटलें तरी चालेल.

एके दिवशीं गोखले यांनीं रेसिडेंट साहेबांचे छावणीवर प्रथम हल्ला केल्यामुळें लढाई सुरू झाली; आणि जरी कांहीं वेळ पर्यंत उभयतां फौजांकडून तोफांचे माऱ्याचा सामना झाला, तरी निर्णयात्मक म्हणून कांहींच झालें नाहीं. रेसिडेंट साहेबांजवळ पुण्यावर हल्ला करण्या पूर्ती फौज नव्हती यामुळें पुढें कांहीं दिवसपर्यंत लढाई झाली नाहीं. इतक्या अवकाशांत घोडनदी वगैरे ठिकाणांहून इंग्रजांची अणखी फौज येऊन पोहोंचली. ती फौज दुसरे दिवशीं पुण्यावर हल्ला करणार, अशी बाजीराव साहेब यांस खबर रात्रीस लागल्यावरून ते लागलेच उठून बावदेवाचे घाटावर गेले, आणि इंग्रजी फौज पुण्यावर चालून आलेली पाहतांच ते तेथून सत्वर निघून साताऱ्याकडे गेले. ही गोष्ट तारीख १७ नोवेंबर सन १८१७ इसवी रोजीं झाली. पेशवे निघून गेल्यामुळें इंग्रजी फौजेनें पुण्यांत बिनहरकत प्रवेश करून तिचे सेनापतीनें

पेशव्यांचे (शनवारचे) वाड्यावर इंग्रजी बावटा उभा केला आणि शहरांत कोणी लूट करूंनये म्हणून नाकेबंदी केली. पुढें एल्फिन्स्टन् साहेब, जे पूर्वीं रेसिडेंट होते, तेच मुख्य कमिशनर होऊन सर्वांस अश्वासन देण्यास्तव त्यांनीं जागोजाग जाहिरनामे लाविले तेणेंकरून शहरांतील लोकांचीं मनें स्वस्थ झालीं. या प्रमाणें पुणेंशहर म्हणजे संपूर्ण मराठी राज्याची राजधानी येथून बाजीराव रघुनाथ पेशवे निघून जाऊन त्यांत इंग्रज लोकांचा अंमल झाल्यानें ज्या मराठी राज्याचा थोरले शिवाजी माहाराज यांनीं पाया घातला असून जें बाजीराव बल्लाळ पेशवे यांनीं वाढविलें होतें तें नष्ट झालें.

प्रकरण २ रें.

बाजीरावसाहेब थेट सातान्यास न जातां कृष्णातीरीं जाऊन माहुली येथें राहिले; आणि तेथून त्यांनीं सातारचे राजे' त्यांचे बंधु आणि मातुश्री यांस आणण्याकरितां फौजेची एक टोळी पाठविली. तथापि त्यांचे येण्याची वाट न पाहातां ते तेथून निघून पंढरपुरास चालते झाले; आणि तेथून जुन्नराकडे जात असतां, सातारचे राजे यांस आणण्यास जी टोळी गेली होती ती त्यांस घेऊन त्यांच्या लष्करांत येऊन दाखल झाली. मग बाजीरावांनीं पुण्यावर येण्याच्या इराद्यानें तेथून कुच करून कोरेगांवाजवळ तळ दिला; परंतु घोडनदीहून कपतान स्टाटंन् याचे हाताखालीं सुमारें ८०० कवाइती शिपायांची फौज पुण्यास जाण्याकरितां निघाली असून तिनेंही कोरेगांवांतच तळ दिला. तिला हाकून लावावें ह्मणून मराठी फौजेनें तिजवर हल्ला केला. तेव्हां मोठी निकराची लढाई झाली ती प्रसिद्धच आहे. या लढाईचा शेवट झाला नव्हता तोंच बाजीराव तेथून निघून गेले, त्यामुळें ती लढाई सोडून सर्व मराठी फौजेस त्यांजबरोबर जाणें भाग पडलें.

बाजीराव कोरेगांवाहून निघाले ते समूर कर्नाटकाकडे चालते झाले, कारण म्हैसूरचे राजाकडून मदत मिळण्याची त्यास आशा वाटत होती; परंतु त्या प्रांतांत टामस मनरो साहेब फौजेनिशीं असल्यामुळें बाजीराव त्या प्रांतीं पोहोंचल्यावर ती आशा व्यर्थ आहे असें त्यांस दिसून आलें. तेव्हां ते माघारे वळून सोलालापूरास आले. तेथें त्यांनीं माणकेश्वरांचे कारकुनापासून खर्चाकरितां कांहीं ऐवज घेतला. सदर्हू मुक्कामीं नागपूरवाले आपासाहेब भोंसले यांजकडून गणपतराव नांवाचा सरदार कांहीं स्वारांनिशीं त्यांचे मदतीस आला; परंतु इंग्रजी फौज बेळापुरास येऊन पोहोंचली अशी त्यांस खबर आल्यावरून ते तेथून निघून आष्टें गांवीं गेले. तेथें त्यांचा तळ पडला असतां, इंग्रजी फौज जवळ आल्याची खबर त्यांस समजली. तेव्हां ते घाबरून बापू गोखले यांस ह्मणाले कीं, "असेंच तुम्ही आमचें रक्षण करितां काय ?" त्याजवर गोखले यांनीं जबाब दिला कीं, "आपले पिछाडीचा बंदोबस्त मीं केला आहे. व पुढले बाजूस मी स्वतः आहें." असें बोलून त्यांनीं निपाणकर यांस आपले मदतीस बोलाविलें. इतक्यांत स्मिथ साहेबांचे स्वार अगदीं समीप आलेले त्यांचे दृष्टीस पडले. तेव्हां त्यांचे लोक म्हणाले कीं, "आपण मागें हटून चांगले तयारीनिशीं इंग्रजी फौजेशीं सामना करावा" परंतु ते त्यावेळेपर्यंत फिरून फिरून अगदीं थकले होते. तशांत त्यांनींच इंग्रजांबरोबर लढाई करण्याविषयीं बाजीराव साहेबांस उत्तेजन देऊन सर्व जबाबदारी आपले शिरावर घेतली होती; परंतु त्यांस आपला जय होण्याची आशा मुळींच दिसेना. तेव्हां अपकीर्ति होऊन जगण्यापेक्षां लढाईंत मरून जाणें बेहेत्तर आहे असें त्यांस वाटून त्यांनीं लागलाच लढाई करण्याचा निश्चय केला, आणि जे लोक मागें हटून चांगले तयारीनिशीं लढाईस यावें असें म्हणत होते त्यांस त्यांनीं असा जबाब दिला कीं, "जें काय व्हावयाचें असेल तें येथेंच होईल; मी आतां माघारा जाणार नाहीं." असें बोलून,

त्यांजवळ जे फक्त तीनशेंच स्वार होते तेवढ्यांनिशीं त्यांनीं इंग्रजी स्वारांवर हल्ला केला. तेव्हां लढाई सुरू झाली, तिचेअंतीं ते इंग्रज लोकांकडील एका कडाबीनवाल्या स्वाराच्या हातानें मारले गेले. नंतर पेशवे लागलेच निघून गेले. मग कितीएक हत्ती व इतर पुष्कळ सामान इंग्रजी फौजेचे हातीं लागलें. शिवाय सातारचे राजे त्यांचे बंधु व मातुश्री हीं इंग्रजांचे हातीं लागलीं. त्यांस इंग्रजांचे सेनापतीनें चांगलें अश्वासन देऊन पुण्यास एलफिन्स्टन साहेब यांजकडे पाठवून दिलें.

बाजीराव साहेब आष्टयाहून कोपरगावीं गेले. तेथें त्यांस पेंढाऱ्यांचा एक सरदार रामदीन हा येऊन मिळाला. मग ते तेथून बिडास गेले, आणि तेथून पूर्वेस वळून वऱ्हाडांत चांद्यास गेले. त्या ठिकाणाहून त्यांनीं आपासाहेब भोंसले यांजकडून मदतीस आलेले गणपतराव यांस माघारे पाठवून आपण वर्धानदीचे किनाऱ्यावर तळ दिला; परंतु तेथें इंग्रजी फौजेनिशी कर्नल आडम नांवाचा एक इंग्रज सरदार येऊन पोहोंचला अशी खबर आल्यावरून ते त्या नदीचे पश्चिमेस पांढरकवडा येथें तळ देऊन राहिले. तेथेंही त्यांस आडम व डोवटन यांच्या फौजांनीं गांठिलेअसतां, त्यांस तेथून निघून जाणें भाग पडलें. तथापि ते चुकून आडम साहेबांचे छावणीकडे गेले, त्यामुळें त्यांचे पुष्कळ लोक मारले गेले; आणि त्यांचे कनिष्ट बंधु चिमाजीआपा हे आपा देसाई निपाणकर व नारोपंत आपटे यांजबरोबर निघून जनरल स्मिथ यांस शरण गेले. बाजीराव तेथून नर्मदेकडे त्वरेनें जात असतां, त्यांचे पाठीस डोवटन याची फौज लागली होती. त्यामुळें त्यांस विश्रांति घेण्यास फुरसत न मिळून त्यांचे फार हाल झाले. सबब विसावा मिळण्यास्तव ते तापी नदी उतरून पलीकडे गेले. तत्रापि इंग्रजी फौज आपले मागून येतच आहे असें त्यांस कळल्यावरून त्यांनीं शिंदवा घाटावर नर्मदा उतरून जाण्याचा विचार मनांत आणिला; परंतु त्या घाटावर इंग्रजी फौजेचा मजबूत बंदोबस्त असून सर जान मालकम यांनीं आपल्यास कैद करण्या-

ची तयारी केली आहे, असें त्यांस समजल्यावरून त्यांचें धैर्य अगदीं खचलें. त्यावेळेस त्यांजबरोबर सरदार ह्मटले तर फक्त विठ्ठलराव विंचूरकर व आबा पुरंदरे एवढे मात्र आपापल्या शिलक राहिलेल्या फौजेनिशीं होते. अशा विकट प्रसंगीं पुढें काय करावें हें पेशवे यांस सुचेना. तेव्हां त्यांनीं बरोबर असलेली मंडळी जमवून विचार केला, त्यांत असें ठरलें कीं, मालकम साहेब हे आपले ओळखीचे आहेत; याकरितां त्यांजकडे वकील पाठवून त्यांचें काय ह्मणणें आहे त्याचा खुलासा आणवावा. त्यावरून त्यांनीं आनंदराव चंदीचंदावरकर नांवाचे मनुष्यास मालकम साहेब यांजकडे बोलणें बोलण्यास पाठवून दिलें. नंतर बाजीराव साहेब तेथून माघारे फिरून वकील काय जबाब आणितो तो पाहण्यास्तव अशीर गडाजवळ धुळकोट येथें राहिले.

आनंदराव चंदीचंदावरकर यानें तारीख १६ मे सन १८१७ ई० रोजीं महू येथें मालकम साहेबांची भेट घेऊन त्यांस बाजीराव यांचें पत्र दिलें. तेव्हां मालकम साहेबांनीं बाजीराव यांजकडे बोलणें बोलण्याकरितां दोन साहेब लोक पाठविले. त्यांनीं श्रीमंतांची भेट घेऊन त्यांस असें कळविलें कीं, "इंग्रज सरकार तुमचा सत्कार करण्यास तयार आहेत; परंतु तुम्ही राज्यावरील दावा सोडून द्यावा आणि इंग्रज सरकार तुमचे गुजाऱ्यास जी नेमणूक औदार्यानें करून देईल ती तुम्हीं घेऊन, भागीरथीचे कांठीं ज्या ठिकाणीं राहण्याचें तुम्हांस पसंत पडेल त्या ठिकाणीं तुम्ही रहावें. तुह्मांस हें कबूल असेल तर तुह्मीं त्रिंबकजी डेंगळे यास मालकम साहेबांचे स्वाधीन करावें, व पेंढाऱ्यांचा सरदार रामदीन व जे इतर पेंढारी तुम्हांजवळ असतील ते सर्व दूर करावे, आणि मालकम साहेब यांचे छावणींत येऊन तेथें त्यांची भेट घ्यावी." याचा जबाब बाजीराव यांनीं दिला कीं, "तुम्ही जें बोलणें बोलतांतें केवळ एकटयाविषयींच बोलतां. मजबरोबर कितीएक सरदार व मुत्सद्दी आपला सर्वस्वी नाश करून आले आहेत, व माझे पूर्व-

जांनीं चिरकाल चालणारीं अशीं कितीएक धर्मकृत्यें केलीं आहेत, त्यांची वाट काय ? इंग्रज सरकार औदार्यानें नेमणूक करून देईल असें तुम्हीं मोघम बोलतां; आमचे बंधु अमृतरावसाहेब यांस सालिनां आठ लाख रुपयांची नेमणूक मिळत आहे त्यापेक्षां माझी नेमणूक कमी असणें योग्य नाहीं; या सर्व गोष्टींचा खुलासा झाला म्हणजे मी काय तो जबाब देईन" ही सर्व हकीकत इंग्रज वकिलांनीं मालकम् साहेब यांस लिहून कळविली. त्यांनीं जबाब पाठविला कीं "बाजीराव आमचे लष्करांत येऊन इंग्रज सरकारास शरण येतील तर, त्यांचे ह्मणण्याचा विचार कर्ण्यांत येईल." हा जबाब इंग्रज वकीलांनीं बाजीरावसाहेब यांस कळविला. नंतर श्रीमंतांनीं विंचूरकर वगैरे सरदार व मुत्सद्दी व मानकरी यांस एकत्र जमा केलें आणि त्या सर्वांस तो मजकुर सविस्तर सांगून शेवटीं असें कळविलें कीं, " मालकम् साहेब हे ठराव होण्यापुर्वींच आह्मास आपले लष्करांत बोलावितात हें कसें ?" त्यावर त्या सर्वांनीं त्यांस असें सांगितलें कीं, " आपली बहुतेक फौज आपल्यास सोडून गेली. चारीबाजूस इंग्रजी फौजेच्या चार मजबूत टोळ्या असून त्या आपल्यास कैद करण्याचे खटपटींत आहेत. मालकम् साहेब यांचा व आपला पूर्वींचा परिचय असून ते विचारी व दयाळू आहेत. ते आपले बाबदींत कांहीं गैर करतील असें आह्मांस वाटत नाहीं. याकरितां हेंच उचित दिसतें कीं आपले हल्लींचे स्थितीवर व आपत्कलावर नजर द्यावी आणि सर्व भरंवसा साहेब मौसूफ यांचे औदार्यावर ठेवून याप्रसंगीं त्यांचे ह्मणण्याप्रमाणें वागावें. " हें ऐकून बाजीरावसाहेबांनीं तसें करण्याचें कबूल केलें. मग त्यांनीं इंग्रज वकिलांचे मार्फत मालकम् साहेब यांस खासगी रीतीनें भेटीस बोलावून ते आल्यावर एकांतीं त्यांशीं भेट घेतली. तींत परस्परें कांहीं वेळ बोलणें झाल्यावर शेवटीं त्यांनीं आपला सर्व भरंवसा साहेब मौसूफ यांचे औदार्यावर ठेवून त्यांचे ह्मणण्याप्रमाणें वागण्याचें कबूल केलें. इ-

तर्के मात्र अधिक सांगितलें कीं. " मजबरोबर राहाण्यानें माझे पदरचे कितीएक लोकांचे नुकसान झालें आहे. त्यांचे गुजाऱ्याचा बंदोबस्त ठेवावा. " त्याचा जबाब मालकम् साहेबांनीं असा दिला कीं, " या गोष्टीचा योग्य विचार करण्यांत येईल. " याप्रमाणें बोलणें झाल्यावर मालकम् साहेब परत गेले. नंतर त्यांनीं बाजीरावसाहेब यांस तारीख१ जून सन १८१८ इसवी रोजी दरबारी रीतीनें पत्र लिहून त्याजबरोबर टरावाची यादी पाठवून दिली.* सदरहू यादीतील शर्ती येणें प्रमाणें;—

" १ बाजीराव यांनीं पुण्याचें राज्यावरील किंवा कोणतेही राजाधिकारावरील आपला व आपले कायममुकाम यांचा दावा, हक्क व संबंध सोडून द्यावा.

२ त्यानीं आपले कुटुंब, आपले पदरचे लोक व चाकरपेशे यांजपैकीं थोडे लोक बरोबर घेऊन लागलेंच ब्रिगेडीयर जनरल मालकम् यांचे छावणींस यावें. तेथें त्यांचा बहुमानाने व आदरानें सत्कार होईल आणि त्यांचे विनंति वरून त्यांचें वास्तव्या करितां हिंदुस्थानांत काशी अगर इतर कोणतें तरी पवित्र ठिकाण गवरनर जनरल मुकरर करतील. तेथें त्यांस सुरक्षितपणें पोंहचवून देण्यात येईल.

३ दक्षिणेचे स्वस्थतेकरितां व बरसात समीप आली आहे सबब एक दिवसाचाही दिरंग न करितां त्यांस हिंदुस्थानांत गेलेंच पाहिजे; परंतु ब्रिगेडीयर जनरल हे असा करार करितात कीं त्यांचे कुटुंबाची जी माणसें पाठीमागें राहिलीं असतील तीं साधेल तितके लौकर त्यांजकडे पावतीं करण्यांत येतील आणि त्या माणसांचा प्रवास शिघ्र व सोईचा होण्यास्तव हरएक प्रकारें व्यवस्था ठेविली जाईल.

---

* ही यादी वांचून पाहिली म्हणजे अगदीं पराजीत झालेले असे जे पेशवे बाजीराव यांजवर इंग्रज लोकांनीं किती सक्ती केली हें वांचकांचे सहज लक्षांत येईल.

४ ही व्यवस्था बाजीराव यांनीं स्वसंतोषानें कबूल केल्यावर त्यांस आपले स्वतःचे व आपले कुटुंबाचे उपजीविकेस्तव कंपनी सरकारांतून विपुल पेनशन मिळेल. ह्या पेनशनाची रक्कम गवरनर जनरल हे ठरवितील; परंतु सदर्हू पेनशन सालीनां आठ लक्ष रुपयांहून कमी होणार नाहीं असें वचन देण्याचें ब्रिगेडिअर जनरल मालकम् हे आपल्याकडे घेतात.

५ ही व्यवस्था पूर्ण रीतीनें व शीघ्रतेनें सिद्धीस नेऊन इंग्रज सरकारावर आपण पूर्ण भरंवसा ठेवितों असें बाजीराव साहेब दाखवितील तर, ज्या मुख्य मुख्य जाहगिरदारांचे व पदरचे जुने लोकांचे एकनिष्ठेमुळें त्यानीं त्यांचा अंगीकार केला आहे त्या लोकांबद्दल त्यांची विनंती पुष्कळ लक्ष पूर्वक ऐकिली जाईल, आणि ज्या पुज्य ब्राम्हणां करितां, व जीं धर्माची संस्थानें त्यांचें घराण्यानें आश्रय देऊन चालविलीं आहेत त्यांकरितां त्यांनीं विनंत्या केल्या आहेत त्याही मनास आणिल्या जातील.

६ वर लिहिलेल्या शर्ती बाजीराव यांनीं फक्त कबूल केल्या पाहिजेत इतकेच नाहीं, तर, त्यांनीं स्वतः ह्या वेळेपासून २४ तासांत ब्रिगेडियर जनरल मालकम् यांचे छावणींत आलें पाहिजे. नाहीं तर लढाई पुनः सुरू केली जाईल, आणि पुढें त्यांजबरोबर ठरावाचें बोलणें केलें जाणार नाहीं."

"आली या भोगाशीं असावें सादर" अशी वृद्ध पुरुषांची म्हण आहे. तीस अनुसरून बाजीरावसाहेबांनीं मालकम् साहेबांच्या स्वाधीन होण्याचा निश्चय केला; आणि मरण समयीं जशीं मनुष्याची अत्यंत दुःखदायक स्थिती होत्ये तद्वत त्यांची स्थिती झाली असतां, त्यांचा कंठ दाटून आला आणि त्यांनीं मंडळीचे मुखांकडे पाहिलें तेव्हां त्यांच्या नेत्रांतून आश्रुधारा चालल्या. मग कोणाशीही न बोलतां ते म्यान्यांत बसून चालते झाले. त्या वेळेस त्यांच्या म्यान्यी बरोबर भोयांखेरीज पांच साहा हुजरे व चारपांच शागीर्द इतकेच गेले, कारण इंग्रजांकडून त्यांस नेण्याकरितां जे

इंग्रज तुरुकस्वार व पलटणी शिपाई आले होते त्यांनीं इतरांस त्यांबरोबर जाण्याची मनाई केली आणि त्यांच्या म्यान्यासभोंवता आपल्या लोकांचा गराडा घालून तो म्याना मालकम् साहेबांच्या छावणीत नेला. तेथें बाजीरावसाहेब मालकम् साहेबांच्या स्वाधीन झाले. याप्रमाणें बाजीराव साहेबांनीं आरंभिलेले युद्धाचा परिणाम होऊन पेशव्यांचें राज्य लयास गेलें. ही गोष्ट तारीख ३ जून सन १८१८ इसवी रोजीं झाली.

बाजीरावसाहेबांच्या पाठीमागून विठ्ठलराव विंचुरकर हे लष्करी पोषाग एकीकडे टेवून फक्त चार पांच स्वारांनिशीं मालकम् साहेबांचे छावणींत गेले. येथें त्या साहेबांचे भेटींत त्यांनीं आपली तरवार पडदळ्यासुद्धां हातांत घेऊन “ज्यांचे रक्षणाकरितां मींही तरवार बांधीत होतों त्यांच्या रक्षणाचा तुह्मीं पत्कर घेतला आहे सबब ही मी तुमच्या स्वाधीन करितों” असें बोलून त्यांनीं ती तरवार साहेब मौसूफ यांजपुढें ठेविली. पुढीलकाळीं विठ्ठलराव यांस त्या गोष्टीचें स्मरण झालें ह्मणजे बहुत दुःख वाटून ते असें ह्मणतकीं “मला युद्धांत मरण आलें असतें तर बरें झालें असतें; कारण जाणें हें माझ्या शूर कुलास कलंक लागण्यासारखें झालें आहे.

पुढें लौकरच मालकम साहेब यानीं बाजीराव साहेब यास ब्रह्मवर्तास रवाना करून दिले.

बाजीराव साहेब ब्रम्हवर्ताकडे चालते झाले त्या वेळेस त्यांज बरोबर सरदार व लष्कर गेलें त्याचा तफसील;—

१ बापु गडबोले या नांवाचे बक्षी यांचे ताब्यांतील लष्कर.
२ पेशव्यांच्या हुजुरातीच्या पागा सुमारें पांच.
३ शिवाय कोतवाल घोडे, हत्ती, उंट, पालख्या, म्याने, गाड्या, तट्टे, बैल वगैरे.
४. बापु गोखले यांचे निसबतीचे रामचंद्र व्यंकटेस यांचे ताब्यांतील फौज;—

१ रामचंद्र व्यंकटेश याची खासगी पागा.

१ बापु गोखल्यांचे मामा बाळाजीपंत मराठे यांचे हाताखालची पागा.

१ बापु गोखले यांचे निसबतीचे सरदार भिकाया जगताप याचे हाताखालची पागा.

१ कैलासवासी बापु गोखले यांचे कोतवाल घोडे, हत्ती, उंट वगैरे लवाजमा.

१ विंचूरकरांचे दिवाण बाळोबाबाबा सालकाढे यांचे हाता खालीं त्यांचे मालीकांनीं सुमारें दीडशें स्वारांची पाठविलेली पागा व सरंजाम.

१ हमडेरे यांचे निसबतीचे सरदार श्रीधर बापु दामले यांचे हाताखालची पागा.

बाजीरावसाहेब यांची स्वारी ब्रह्मवर्तास पोंहचल्यावर इंग्रज सरकारांनीं त्यांचे छावणी कारितां भागीरथीचे किनाऱ्यावर सुमारें साहा मैलाचे परिघाची जागा नेमूनदेऊन तिचे चोहोंबाजूंस हद्दीच्या खुणांकरितां दगडाचे सोळा स्तंभ रोंविले आणि नीट बंदोबस्त राहाण्यास्तव तेथें रेसिडेंटही ठेविला.

पूर्वी बाजीरावसाहेब यांचे तर्फेनें रेसिडेंट साहेबांकडील वकीलीचें काम विंचूरकरांचे दिवाण बाळोबाबाबा सालकाढे यांजकडे होतें; परंतु " मी आतां बृध्ध व अशक्त झालों सबब माझ्या कामावर दुसऱ्याची योजना करण्यांत यावी " ह्मणून बाळोबाबानीं श्रीमंतांस विनंती केल्यावरून, त्यांनीं गोखल्यांचे निसबतीचे रामचंद्र व्यंकटेश यांजकडे तें काम सांगून आपले छावणीचे हद्दींतील दिवाणी व फौजदारी अधिकारही त्यांजकडे सोंपून दिले. रामचंद्र व्यंकटेश हे पूर्वी पेशवाईंत बापुगोखले यांचे वतीनें एक सुभ्यावर होते, म्हणून त्यांस सुभेदार असें म्हणत असत.

बाजीराव साहेब यांजबरोबर ब्रह्मवर्तास गेलेल्या मंडळीस

फौजेच्या खर्चाबद्दल त्यांजकडून ज्या नेमणुका मिळूं लागल्या त्यांचा तफसील;—

१ रामचंद्र व्यंकटेश यांस;—

१ बापुगोखले यांचे निसबतीच्या तीन पागा व इतर शिलेदार स्वार यांचे गुजाऱ्याबद्दल दरमाहा रुपये.....	६,०००
१ खासगत लवाजमा व भोजन खर्च वगैरेबद्दल रुपये...	२,०००
२	८,०००

१ विंचूरकरांचे दिवाण बाळोबाबाबा सालकाडे यांचे हाताखालचे पागेचे खर्चाबद्दल दरमाहा रुपये.	१,०००
१ ढमढेरे यांजकडील श्रीधरबापु दामले यांचे हाताखालीं शेवटीं फक्त ३५ स्वार कायम होऊन दर स्वारास दरमाहा १५ रुपये प्रमाणें दामले मजकूर यास मिळूं लागले ते रुपये ५२५ व त्यांचे वेतन मिळून एकंदर रुपये....	६००

बाजीराव साहेब यांची पागा, पीलखाना वगैरे अठरा कारखान्यांचें काम बापु गोखले यांजकडेस होतें. त्याबद्दलचा खर्च नेमलेला नसून कच्चा होत असे. तें काम गडबोले यांनीं आपले अंतकाळ पर्यंत एकनिष्ठेनें व मोटच्या इमानदारीनें केलें. त्यांचे प्रामाणिकपणास्तव त्यांजवर बाजीरावसाहेब यांचा अत्यंत लोभ होता.

बाजीरावसाहेब यांचे ब्रह्मवर्त येथील पदरचे लोकांपैकीं ज्यांस इंग्रज सरकारांकडून पेनशनें मिळूं लागलीं ते इसम व दरमाहा पेनशनाच्या रकमा येणेंप्रमाणें.:—

१ रामचंद्र व्यंकटेश सुभेदार यांस रुपये...	१०००
१ बापू गडबोले यांस रुपये.....	३००
१ बाळोबाबाबा सालकाडे निसबत विंचूरकर यांस रुपये	२५०

१ अण्णा देशमुख यांस रुपये... ... ... १५०
१ अंताजीपंत मामा यांस रुपये. २५०

ह्या नेमणुका ज्यांस मिळत होत्या त्यांचे हयाती आखेर चालल्या. त्यांपैकीं बाळोबाबाबा सालकाढे हे सन १८२७ इ० चे सुमारास श्रीमंतांचे परवानगीनें काशीस राहावयास गेले. तेव्हां त्यांजकडील प्रागेचे काम श्रीमंतांनीं त्यांचे पुत्र निलकंठराव यांजकडे चालविलें. बाळोबाबाबा हे काशीस असतां त्यांस इंग्रज सरकाराकडून जीं दरमाहा रुपये आडीचशांची नेमणूक मिळत होती तिजवर त्यांनीं गुजारा केला. आणि पुढें सन १८३३इ० चे सुमारास ते संन्यासग्रहण करून काशीक्षेत्री परलोकवासी झाले. बापू गढबोले सन १८५०इ० चे सुमारास ब्रम्हवर्त येथें आपले मालिक जिवंत असतां कैलासवासी झाले. त्यामुळें इंग्रज सरकाराकडील त्यांची रुपये तीनशांचीं नेमणूक बंद झाली.

रामचंद्र व्यंकटेश सुभेदार हे मोठ्या दक्षतेनें व हुशारीनें इंग्रज सरकाराबरोबर वागले. त्यामुळें त्या सरकारचे कामगार लोकांमध्यें त्यांचें चांगलें वजन होते. शिवाय त्यांनीं बाजीराव साहेब यांचें वर्तनावर दक्षनजर ठेवून रेसिडेंट साहेबांचें धोरण ही चांगलें ठेविलें होतें. त्यांचेच योगानें बाजीराव साहेब यांची स्थिती व बोझ कायम राहून शेवट पर्यंत एकसारखा क्रम चालला. बाजीराव साहेबांचा देहांत झाल्यावर एक वर्षानें रामचंद्र सुभेदार हे परलोकवासी झाले. तेव्हां इंग्रज सरकाराकडून त्यांस जें दरमाहा एक हजार रुपयांचे पेन्शन चालत होतें तें बंद झालें. त्यांस तीन पुत्र होते. पैकीं जेष्ठ पुत्र नाना सुभेदार यांचे बाजीराव साहेबांचें दत्तपुत्र धोंडोपंतनानासाहेब यांजबरोबर पूर्वीपासूनच किती एक कारणास्तव वैमनस्य पडलेलें होतें. पुढें सन १८५७ इ० सालीं ब्रम्हवर्त येथें लष्करी लोकांचें बंड झालें असतां, त्याचे बंदोबस्तास्तव इंग्रज सरकारची फौज गेली. त्या प्रसंगीं नाना

सुभेदार यांनीं त्या सरकारचे अंमलदारांस बरीच मदत दिल्याव-रून तें सरकार खूष होऊन त्यानें बाजीराव साहेबांचे छावणी-ची सोळा दगडी स्तंभांत्रे हद्दींतील जमीन त्यांस बक्षीस दिली. आ लिकडे बाजीराव साहेबांचे लष्करांतील वस्ती उठून गेल्यामुळें तेथें हाल्लीं शेतें व वाडचा होंउन नाना सुभेदार यांस सालिना सुमारें सात आठ हजार रुपयांचें उत्पन्न मिळतें असें ऐकिवांत आहे.

बाजीरावसाहेब महूहून निघून गेल्यावर लौकरच विठ्ठल-राव विंचुरकर हे मालकम्साहेब यांचे बोलावण्यावरून त्यांचे भेटीस गेले. त्या बैटकींत साहेब मौसूफ यांनीं त्यां-स असें कळविलें कीं "या लढाईत तुम्हीदुराग्रहानें बाजी-राव यांचे पक्षास जडून राहिल्यामुळें तुमचें सर्वस्व जाऊन इंग्रज सरकारचे औदार्यावर तुमचा दावा बिलकूल राहिला नव्हता; परंतु आ-लीकडे तुम्ही समय विशेषीं आमचे सरकारचे बरेच उपयोगीं पडलां यामुळें एलफिन्स्टन साहेब कमिशनर यांनीं दक्षिणेतील सरदारांच्या ज्या तीन प्रती* केल्या आहेत त्यांपैकीं तिसऱ्या प्रतींत तुमचें नांव

---

*ह्या प्रती कशा होत्या हें चागले रीतीनें वाचकाचे लक्षांत येण्यास्तव एलफि-न्स्टन साहेब रेसिडेंट यांजकडून ब्रिगेडियर जनरल सरजान मालकम् यांस तारीख २८ माहे मे सन १८१८ इसवीचे पत्र गेलें त्याचा उतारा आम्ही पुढें दाखल करितो;—

'तुमचें तारिख १८ माहे हालचें पत्र मला पावलें. त्या पत्रासोबत तुह्मी कर्नेल आडम यांस त्याच तारखेचें जें पत्र लिहिलें त्याची नक्कल मळफूफ करून बाजीराव यानीं माझे स्वाधीन व्हावें व त्यांच्या पदरच्या लोकांबरोबर ठराव व्हावे ह्मणून त्यांशीं बोलणीं चालविलीं आहेत असें तुह्मी त्यांत लिहिलें आहे सबब मला असें वाटतें कीं ज्या सरदारांनीं पेशव्यांस सोडिलें त्या सरदा-रांबरोबर मीं ज्या नियमांनीं ठराव करीत आहे ते नियम तुह्मांस कळविणें उ-पयुक्त आहे [याकरितां ते मीं पुढें लिहून कळवितों.]

ज्या सरदारांनीं बाजीराव यांस सत्वर सोडिलें त्यांस त्यांचें जाहगिरी शि-वाय अधिक मलूक देण्याचें मीं बोललों आहे. ज्यांनीं त्यांस त्यानंतर सो-डिलें त्यांच्या ताब्यांत हाल्लीं असलेलें मात्र मीं त्यांजकडे कायम ठेविन. क-र्नेल आडम यानें बाजीरावांचा मोड केल्यानंतर ज्या सरदारांनीं त्यांस सोडिलें त्यांजकडे त्यांचे घराण्यांचे उपजिविकेस्तव मीं जातीच्या जाहगिरी मात्र ठेविन आणि त्या जाहगिरी खेरीज जे त्यांचे हातांत असेल तें मी सर्व खालसा करीन.

(पुढें चालू.)

दाखल करून तुम्हांकडे तुमची जातीची जाहागीर मात्र वंश परंपरेनें चालविली जाईल " त्याजवर विठ्ठलराव बोलले कीं "या मेहरबानगीबद्दल मी तुमचा आभारी आहें; परंतु मजपाशीं बहुत स्वार आहेत त्यांपैकीं साहाशें स्वार तरी तुम्ही सरकार नौकरींत घेऊन त्यांजवर माझी सरदारी कायम ठेवावी." परंतु मालकम् साहेबांनीं जबाब दिला कीं, "मी तुम्हांस जातीचे जाहागिरीबद्दल जें वचन दिलें आहे तें मी एलफिन्स्टन साहेब यांस लिहून कळविलें आहे. त्याखेरीज मला आतां अधिक गुंततां येत नाहीं. तथापी तुम्हावर जितकी अधिक मेहेरबानगी करवेल तितकी करण्याविषयीं मी साहेबमौसूफ यांस लिहीन. बाजीराव हे आतां कोठे तरी भागीरथी तिरीं राहातील. त्यांजकडे जाण्याचें तुम्हास मुळींच कारण राहिलें नाहीं. याकरिता तुम्ही दक्षिणेंस परत जाऊन एलफिन्स्टन साहेब यांची भेट घ्यावी; म्हणजे तें तुमची दरोबस्त जातीची जाहागीर व खासगत स्थावर जंगम मिळकत तुमचे ताब्यांत देतील आणि सर्व प्रकारें तुमचे दरजा प्रमाणें तुमचा मान ठेवितील." याप्रमाणें मालकम् साहेब यांनीं विठ्ठलराव यांची खातरजमा करून त्यांस देशीं जाण्यास रजा दिल्यावर ते आपले छावणीस गेले. नंतर ते लवकरच दक्षिणेस जाण्यास निघाले, तेव्हां त्यांजबरोबर आबा पुरंदरे हेही निघाले.

(मागील पृष्ठावरून समाप्त.)

आणि जे लोक अद्यापपर्यंत त्यांजबरोबर आहेत त्यांस शेवटीं सांगितलल्या सरदारांपेक्षां अधिक चालविण्याचे मीं बोलत नाहीं. पेशव्यांच्या पदरच्या ज्या लोकांबरोबर तुम्ही ठरावाचें बोलणें चालविलें आहे त्या लोकांचे यापेक्षां अधिक हीत होण्याजोगे ठराव तुम्हीं त्यांजपाशी करूंनये म्हणून हें पत्र तुम्हांस वेळेवर पोंहोचण्याची आशा मीं करितों, कारण, ज्या इतर लोकांनीं आमचे झेंड्याखालीं येऊन आमचे औदार्यावर सर्व भिस्त ठेविली आहे त्या लोकांबरोबर केलेल्या ठरावांपेक्षां जर कोणी पेशव्यांस हठवादीपणानें जडून राहिल्याबद्दलची एक बक्षिसी म्हणून तहनाम्यानें अधिक चांगले ठराव करून घेईल तर त्यापासून फार नुकसानीचा परिणाम होईल.

वर लिहिलेल्या युद्धाचे संबंधानें पेशव्यांचे लष्करी सरदारांचे बाबदींत एकंदरीनें विचार करितां त्यांपैकीं फक्त विंचूरकर, पुरंदरे व रास्ते हे त्रिवर्ग मात्र आपले मालिक पेशवे यांचे सुखदुःखांत भागीदार होऊन त्यांजबरोबर शेवटपर्यंत इमानदारीनें वागले, त्यामुळें त्यांचें अति मोठें नुकसानझालें. इंग्रज लोकांबरोबर उपस्थित झालेल्या लढाईचा परिणाम घातकारक होईल असें जरी त्यांस वाटलें होतें तरी इमान सोडूनये म्हणूनच केवळ ते बाजीराव साहेबांबरोबर त्यांचे संपूर्ण पर्यटनात त्यांस जडून राहिले. ते इमान सोडून इंग्रज सरकारचे पक्षास मिळाले असते तर, ज्याप्रमाणें पटवर्धन यांच्या सर्व दौलती कायम राहून त्यांस ज्यास्त मुलुक मिळाले, त्याचप्रमाणें त्यांच्याही दौलती कायम राहून त्यांस अधिक मुलूक मिळाले असते *

---

*पुण्याचे डेप्युटी एजेंट जॉन वार्डन एस्क्वायर यांनीं सन१८३० चे सुमारास विंचुरकर यांचे दिवाणी अधिकाराचे बाबदींत सरकारास रिपोर्ट केला, त्यांतील उतारा खालीं दाखल केला आहे, तो पाहिला म्हणजे वर लिहिलेल्या गोष्टीचा खुलासा वाचकांचे लक्षांत येईल.

'विंचूरचे चीफ हे पेशव्यांचें राज्यांत पहिल्या दर्ज्याचे लष्करी सरदार होते. त्यांचे हाताखालीं एक मोठी फौज होती. शिवाय त्यांचे स्वाधीन जरीपटका म्हणजे पेशव्यांचे राज्याचा मुख्य झेंडा होता. आणि ज्यावेळेस लढाई उपस्थित झाली त्यावेळेस पेंढारी लोकांचा दंगा मोडण्यास्तव इंग्रज सरकारचे मदतीसि पेशव्यांचे फौजेचा जो एक विभाग दक्षिणेंत होता त्याचे छावणीचे मुख्य ठिकाणीं ते पेशव्यांचे तर्फेचे एक सेनापती म्हणून आपले पतकानिशीं तळ देऊन पडले होते. खडकी येथील लढाईची खबर ऐकिल्यावर ते इंग्रज सेनापतीची रजा घेऊन निघून गेले; त्यांनीं संपूर्ण युद्ध संग्रामांत मराठी स्वारांचे इतर पतकांपेक्षां आपले स्वारांस अधिक तसदी दिली; आणि आपले सशास्त्र राज्याचे पक्षाकडे आपण असल्याचे दर्शविलें. आणि पेशवे हे आपले राज्य सर जॉन मालकम् यांचे स्वाधीन करित तोंपर्यंत त्यांनीं इंग्रज सरकारचें प्रभुत्व कधींही मान्य केलें नाहीं. बाजीरावांनीं आपलें राज्य सर जॉन मालकम् यांचे हातीं दिले त्यावेळेस त्यांचे लष्करांत दरोबस्त मराठे बडे लोकांपैकीं स्वामीभक्त असे विठ्ठलराव विंचुरकर, व आबा पुरंदरे हेच दोघे काय ते आढळलें. आणि त्यानंतर ज्या सरकारचे ते ताबेदार झाले त्या सरकाराबरोबर ते तेव्हांपासून तशाच

(पुढें चालू.)

फक्त विंचूरकर यांचे स्थितीचा विचार करितां, त्यांचे अतिशयच नुकसान झालें असें वाटतें. कारण त्यांचा दरोबस्त लष्करी सरंजाम जाऊन, शिवाय त्यांचे पूर्वज विठ्ठल शिवदेव यांनीं उत्तर हिंदुस्थानातील राजे रजवाडे यांचे पुष्कळ उपयोगीं पडून त्या प्रांतीं त्यांजपासून एकंदर पंन्नास साठ हजार रुपयांचे वार्षिक अकाराचे इनाम मिळविलें होतें तें इंग्रजसरकारानें खालसा करून त्या प्रांतातील राजे रजवाडे यांस देऊनटाकिलें.

विठ्ठलराव विंचूरकर आपले फौजेनिशीं बाजीरावसाहेबा बरोबर पुण्याहून निघून गेल्यामुळें इंग्रज सरकारानें त्यांस शत्रू समान मानून त्यांचे कबज्यांतील किल्ले व त्यांचा दरोबस्त फौजेचा व जातीचा सरंजाम, इनाम गांवें, वतनें व आंतील जंगम मिळकतीसुद्धां सर्व ठिकाणचे वाडे, येणे प्रमाणें जप्त केलें; परंतु बाजीरावसाहेब मालकम् साहेबांबरोबर ठराव करून भागीरथी तीरीं राहण्यास निघून गेल्यावर साहेब मौसूफ यांचे रजामंदिनेंते दक्षिणेस परत येण्यास निघाले अशी खबर पुण्याचे कमीशनर एलफिन्स्टन साहेब यांस लागतांच त्यांनीं त्यांचे पुण्यांतील व विंचुर येथील व इतर ठिकाणचे जंगम मिळकतीसुद्धां दरोबस्त वाडे यांजवरील जप्त्या सोईसोईनें खुल्या करविल्या, त्यामुळें ते विंचुरास येऊन पोंहचले त्या वेळेस बीन हरकत आपले वाड्यांत जाऊन

(मागील पृष्ठावरून समाप्त.)

स्वामिभक्तीनें वागत आहेत. या सरदारास जर स्वतंत्र इन्साफ करण्याचा अधिकार अंगभूत नव्हता, तर तो पेशव्यांचे राज्यांतही नव्हता. परंतु दुर्दैवेंकरून त्या युद्धाचा असा परिणाम झाला आहे कीं उत्तम व परम राजनिष्ठ लोक दरिद्रावस्थेस मिळाले आणि जे प्रथम फितूर झाले ते, पेशवे आपले पुणें येथलि राजवाड्यांत असतां, जितके सधन होते तितकेच सधन राहिले आहेत, कारण, ज्या लोकांनीं अतिसत्वर पेशव्यांचा पक्ष सोडिला त्या लोकांबरोबर उत्तम ठराव करणें हें आम्हांस हितावह वाटलें. यावरून लोक चुकून अशी कल्पना करितात कीं, जे विठ्ठलराव विंचुरकर येथें अप्रसिद्ध स्थितींत व दरिद्रावस्थेंत राहात आहेत ते आपलें देशबांधवांचे मत्तें एक यःकश्चित मनुष्य आहेत.

राहिले. तेथें त्यांचे सोबती आबासाहेब पुरंदरे हेही त्यांचे दौस्तीस्तव २।३ महिनेपर्यंत तेथें राहून नंतर पुण्यांस गेले.

वर लिहिलेल्या युद्धास आरंभ होण्यापूर्वीं विठ्ठलराव यांनीं आपली स्त्री गंगाबाई यांजबरोबर कांहीं विश्वासू लोक व एक पागा देऊन त्यांस वांईस पाठविलें होतें. तेथें त्या कांहीं दिवस राहिल्यावर जे चंदन वंदनचे किल्ले विठ्ठलराव यांचे कबजांत होते त्याजवर त्या राहण्यास गेल्या. तेथें कांहीं दिवस राहून तेथून त्या नाशींकास येऊन राहिल्या, आणि विठ्ठलराव विंचुरास परत आल्यावर त्या हरोबस्त खटल्यासुद्धा विंचुरास परत आल्या.

नंतर कांहीं दिवसांनीं विठ्ठलराव हे एलफिन्स्टन साहेब यांचे भेटीकरितां पुण्यास गेले. तेव्हां त्या साहेबांनीं त्यांची भेट योग्य सत्कारानें घेऊन त्यांची मोठी खातर केली; आणि त्यांचे गुजाऱ्यास्तव त्यांचीं इनामी गांवें व वतनें त्यांचें हातांत देऊन त्यांचा जातीचा सरंजाम त्यांजकडे चालविण्याचा ठराव केला. हा ठराव मालकम् साहेब यांचे वचनास अनुसरून होता; व त्याचेच आधारानें एलंफिन्स्टन साहेब यांनीं सन १८१९ इसवी सालीं गवरनर जनरल यांस जो सरंजामपट पाठविला त्यांत विठ्ठलराव यांचे नांवासमूर सर्व खुलासा लिहिला. तो ठराव गव्हरनर जनरल यांनीं सन १८२० इसवी सालीं मंजूर केला.

मालकम साहेब यानीं सदहू वचन एलफिन्स्टन् साहेब कमिशनर यास आपले तारीख ५ माहे जून व तारीख २६ जुलई सन १८१८ इ० चे पत्रांत कळविलें होते व मुख्यत्वेंकरून त्या पत्रांचेच आधारानें सदहू जहागीर विठ्ठलराव विंचूरकर याजकडे वंशपरंपरेनें चालविण्याविषयीं मिस्तर एलफिस्टन् यानीं वर लिहिलेले सरंजामपटांत गव्हरनर जनरल यांस सिफारिष केली होती सबब मराठी तरजम्यासुद्धां सदहू पत्रांच्या नकला व सरंजाम पटाचा उतारा वाचकांचे माहिती करितां आह्मीं पुढें दाखल करितों.

To

THE HON'BLE MOUNTSTUART ELPHINSTONE,

Resident at Poona.

SIR,

I have the honor to acknowledge the receipt of your letter of the 28th Ultimo.

You will see by my late communications that in the propositions I made to Bajirao and upon which he has submitted, I have pledged the Government to no more than that the claims of the Jageerdars should be taken into consideration. In my personal intercourse with the Vakeels, I went no further, and the Jageerdars included in the promise are only the Vinchurkar, the Purandare Chief and the family of Goklah.

Since the receipt of your letter, I have felt myself at liberty to communicate to those Chiefs that though they were not entitled to it, I was confident the liberality of the Governor General would place them on a footing with those Chiefs who had left Bajirao subsequent to the action with Colonel Adam and that I understood it was intended their personal Jageers should be left them, but no Sarinjami lands. I thought it of consequence to make this communication as it relieved those to whom it relates from a state of suspense and will enable them to make arrangements at an early period for the dismissal of their followers.

I cannot conclude this letter without stating that the Vinchurkar has, throughout the negotiation, made every effort to promote an early settlement, and the course he took has no doubt been productive of considerable influence in bringing the wavering mind of Bajirao to the resolution he has adopted. His conduct may, perhaps, hereafter entitle him to some mark of favor. He earnestly entreated that I would recommend five or six hundred of his horse being kept in the English service in any way you

chose. This, however, I refused to do, not knowing how far you might deem such a measure either convenient or politic.

I have the honor &c.,
(Signed) JOHN MALCOLM.

Camp Metawal,
5th June 1818.

सदर्हूचा मराठी तरजमा.

आनरेबल मौन्ट स्टुवर्ट एलफिन्स्टन
पुणें येथील रेसिडेंट यांस,

साहेब,

तुमचें तारीख २८ माहे गुदस्तचें पत्र पावलें.

मीं आलीकडे तुम्हांस जीं पत्रें पाठविलीं त्यांवरून तुम्हांस दिसून येईल कीं, बाजीराव यांजपाशीं मीं जें बोलणें लाविलें व ज्या बोलण्यावरून ते शरण आले आहेत त्या बोलण्यांत जाहगिरदार यांचे हक्कांचा विचार करावा इतकेंच असून त्याखेरीज मीं सरकारास अधिक गुंतविलें नाहीं. माझें बोलणें वकिलांशीं समक्ष झालें त्यांत मीं अणखीं पुढें वाढलों नाहीं व वचनांत जे जाहगिरदार दाखल केले आहेत ते फक्त विंचूरकर, पुरंदरे चीफ व गोखले यांचें घराणें इतकेंच आहेत.

तुमचें पत्र पावल्यापासून मीं त्यांस मोकळेपणें असें कळविलें आहे कीं, जरी तुमचें हक्काचा विचार करण्यावर तुमचा दावा नाहीं तरी मला अशी खात्री आहे कीं, कर्नल आडम यांजबरोबर लढाई झाल्या नंतर ज्या चीफ लोकांनीं बाजीरावांस सोडिलें त्यांचिफांप्रमाणें गवरनर जनरल यांचें औदार्यानें तुमचाही दरजा समजला जाईल व मला असें कळून आलें आहे कीं, तुमच्या सरंजामी जमिनी (गांव) तुम्हांकडे न चालवितां फक्त तुमच्या जातीच्या जाहगिरी मात्र तुम्हांस सोडल्या जातील. त्यां लोकांस हा मजकूर कळविणें मला महत्वाचें वाटलें, कारण त्या मजकुरांशीं

ज्यांचा ज्यांचा संबंध पोंहचत आहे त्यां लोकांचे मनांतील दुग्धा तेणेंकरून दूर होऊन आपले पदरचे लोकांस दूर करण्याची तजवीज करण्यास ते मत्वर समर्थ होतील.

बाजीरावांबरोबर बोलणें चालरें असतां, सत्वर निकाल लागण्यास्तव विंचूरकर यांनीं हरएकप्रकारें यत्न केला व जो मार्ग त्यांनीं स्वीकारिला तेणेंकरून बाजीराव यानीं केलेला निश्चय बनवून आणण्यास्तव त्यांचे डगमगणारें मन बधविण्यास बरीच अनुकूलता झाली यांत संशय नाहीं असें कळविल्यावांचून मला हें पत्र पुरें करितां येत नाहीं.

त्यांची (विंचूरकर यांची) वर्तणूक अशी आहे कीं, ती कदाचित् यापुढें त्यांस कांहीं मेहेरबानगीचे खुणेस पात्र करील. जी रीत तुमचे पसंतीस येईल त्या रीतीनें त्यांचे ६०० स्वार इंग्रजी नौकरींत ठेवण्याविषयीं तुम्हांस सिफारिष् करावी ह्मणून त्यानीं मला विनंति केली. तथापि असें करणें मीं नाकबूल केलें, कारण अशी तजवीज तुम्हांस किती सोईची किंवा शाहाणपणाची वाटेल हें मला कळून आलें नव्हतें.

मुक्काम मिटावल.	मीं आहें वगैरे,
तारीख ५ जून सन १८१८.	(सही) जॉन मालकम.

To

THE HON'BLE MOUNTSTUART ELPHINSTONE,

Resident at Poona.

SIR,

I have receved your letter of the 18th Instant. In explanation of mine of the 5th of June, I have to state that the assurance I gave to the representatives of the Jageerdars—Vinchurkar, Purandare, and Goklah, regarding their personal lands (Jatkee Jageer) were so strong as to amount in my opinion to an engagement, and I should consider them as binding upon the

British faith as if such had been written. The necessity for the aid of those persons did not cease upon the Peishwa's submission. It was essential to the dispersion of his troops and to reconcile his mind to his altered condition and it was throughout freely given. To ensure that object, as well as to dispel unreasonable expectations, it was of consequence to state something specific at as early a period as possible and I congratulated myself on being able to do this by the receipt of your communications of the 20th of May which reached me at the very cricis when such an assurance was necessary.

The statement of the Vinchurkar's Vakeel is, as you conjecture, false. His master never rejected the boon of his personal Jageer. He was from the first grateful for it. It is true that he most earnestly entreated I would write you to shew him any further indulgence you could, and he was most solicitous that you should keep up a part of his horse. I told him that I was confident, he would meet with every reasonable indulgence but that I could promise nothing but his personal Jageer.

The Vinchurkar never proposed to stay with Bajirao, nor did he ever bring forward any thing in the shape of conditions connected with his return to the Deccan. With regard to the Purandare chiefs and Ramchandra and those who were at the head of the Goklah troops, they appeared, from the first, satisfied with the promises made and did not ask for any thing more, nor should I have treated such a request, had they made it, with that attention I gave to the Vinchurkar who, from his family and rank, I considered it might be politic to treat with every kindness and respect.

I have the honor to be &c.,

(Signed) JOHN MALCOLM.

Camp Nily,

26th July 1818.